# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. १६/०८/२०१८

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. १६/०८/२०१८ रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. ०९/०८/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी १०.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्री. धृवकिशोर पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पाटील धृवकिशोर मन्साराम | मा. सभापती |
| २. | श्री. गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३. | श्री. व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ४. | श्री. खंडेलवाल सुरेश जगदिश | सदस्य |
| ५. | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ६. | श्री. विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७. | श्री. तिवारी अशोक सुर्यदेव | सदस्य |
| ८. | श्री. दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ९. | श्रीम. रावल मेघना दिपक | सदस्या |
| १०. | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ११. | श्रीम. दिप्ती भट्ट | सदस्या |
| १२. | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १३. | श्रीम. नुरजहा नजर हुसैन | सदस्या |
| १४. | श्रीम. तारा विनायक घरत | सदस्या |
| १५. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. वंदना विकास पाटील | सदस्या |

**मा. सभापती :-**

सर्व सदस्यांचे हार्दिक स्वागत. सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. १६/०८/२०१८ रोजी सकाळी १०.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय , दुसरा मजला, लालबहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०५ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.** प्रकरण क्र. ४२, **दि. ०७/०७/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**रवि व्यास :-**

मा. सभापतीजी पेज नं. १ पे लास्ट लाईम जो पार्किंग के विषय पे चर्चा हुई थी महानगरपालिका परिसर में जो बाहर की गाडीया पार्किंग होती है। उसपे कुछ निर्णय हुआ है की नही हुआ अभी भी बाहर की गाडीया पार्किंग होती है।

**मा. उपायुक्त (मु.) :-**

सन्मा. सभापती महोदय मागच्या वेळेस जो पार्किंगचा मुद्दा उपस्थित केला होता त्यानुसार आपली जी सेक्युरिटी एजन्सी आहे त्यांना लेखी स्वरुपात आदेश दिले आहेत. दोन सेक्युरिटी स्पेशली त्यासाठी नेमले आहेत. महापालिकेचे अधिकारी आणि पदाधिका-यांच्या गाड्या बघूनच आतमध्ये घ्यायच्या आहेत. आपली गाडी नसेल तर ती गाडी बाहेर काढायला सांगायची आहे.

**दिप्ती भट :-**

सर जे मेन रोड एस.के.स्टोन पासून मिरारोड स्टेशनपासून भक्ति वेदांत हॉस्पीटल ते दहिसर चेक नाक्यावर जाणारा रस्ता तिकडे ज्या गाड्या ठेवतात त्याला आपण काय करणार?

**मा. सभापती :-**

मॅडम रवि व्यासने जो मुद्दा उपस्थित केला तो आपल्या महापालिका परिसर आणि आपल्या इतिवृत्तांतामध्ये आहे. त्याच्यावर काय कारवाई झाली ते विचारले.

**दिप्ती भट :-**

मी आताच खेत्रे साहेबांना म्हटले की आपण ज्या गेल्या एक महिन्यापासून गाड्या उचलतो त्या भंगार किंवा जुन्या असतील तर त्याची दोन महिन्यापासून कम्पलेन्ट दिली आहे. परंतु प्रभाग अधिकारी चव्हाण ह्यांना टाईम नाही. चार महिन्यापासून गाडी पडलेली आहे पण कोणाची आहे ते उचलून घेत नाही. हे करता करता ते पण घ्या.

**मा. सभापती :-**

ठीक आहे. मा. उपायुक्त साहेब सर्व प्रभाग अधिकारींना सुचना द्या की ज्या प्रभागात अशा गाड्या आहेत त्यांनी सर्व प्रभागांची चौकशी करुन त्या सगळ्या गाड्या उचलण्यात याव्या.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय प्रशासनाने तसे आदेश सुरक्षा रक्षकांना दिले असतील मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही. एका बाजूला जी जागा होती ती युनियनच्या ऑफिससाठी बांधायला देण्यात आली ते ऑफिस अधिकृत नाही. अनधिकृत आहे. आता जी जागा आहे ती आम्हाला अपूरी पडते. सुरक्षा रक्षकांना बोलवून विचारा की ते अंमलबजावणी करतात का?

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आपल्याकडे ज्या गाड्या वापरात नसलेल्या गाड्या निर्लेखित करण्यासाठी काढल्या आहेत. त्या उचलून दुसऱ्या प्लेसला शिफ्ट केल्या आहेत. पार्किंगच्या दृष्टीने इथे काय करता येईल त्यासाठी मध्यंतरी एक प्रेझेन्टेशन घेतले आहे. मल्टीलेवल पार्किग अशा प्रकारचे प्रेझेन्टेशन घेतले आहे. एकावर एक गाड्या राहतील अशा प्रकारचे प्रेझेन्टेशन घेतले आहे. त्याची फिजीबीलीटी कॉस्ट तपासून प्रशासकीय अहवाल पुढे करतो.

**जुबेर इनामदार :-**

आमचा स्पष्ट मुद्दा एकच आहे. पालिकेमध्ये कर्मचारी आणि शिपायाकडे पण गाडी आहे. आम्हाला त्याचा वाद नाही पण अधिकारी आणि विश्वस्त ह्या दोन गाड्या आतमध्ये असायला पाहिजेत.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेब जुबेरजीनी आता जे सांगितले की महापालिकेच्या आवारात कोणाच्या गाड्या यायला पाहिजेत आणि कोणाच्या गाड्या यायला नाही पाहिजेत. तो डिसीजन घेण्याचा अधिकार तुम्हाला आहे. प्रत्येक माणूस जर महापालिकेच्या आवारात गाडी घेऊन आला तर गाडी ठेवायला जागा उरणार नाही. तुम्ही मल्टीलेव्हल पार्किंग, स्टॅग पार्किंग म्हणता तो विषय दूरदूरचा आहे. हा डिसीजन घेतला तर २-३ वर्ष होणार नाही. तर त्याच्याबद्दल विचार करुच नका. तुम्ही फ्युचर प्लानिंग करा. पण एक्झीस्टींग तातडीचे म्हणून उपाययोजना काय करायची ते सांगा की महापालिकेमध्ये फक्त हेच अधिकारी नगरसेवकांच्या गाड्या घेऊन येणे क्रमप्राप्त आहे. तुम्ही बाहेरच्या गाड्या बंद केल्या तर तुमचा पार्किंगचा प्रश्न ७० टक्के सॉल्व्ह होईल असे मला वाटते. तुम्ही जो आदेश दिला आहे त्याची अंमलबजावणी कडक करा. तुम्हाला पाहिजे असेल तर माझ्या एका शिपायाला पाठवतो. तो तुम्हाला लिस्ट आणून देईल की एवढ्या गाड्या बाहेरच्या आहेत आणि एवढ्या गाड्या महापालिकेच्या आहेत.

**जुबेर इनामदार :-**

सर रात्री एकदा मिरा भाईंदरमध्ये फिरायला या आणि बघा की पालिकेच्या आवारामध्ये रात्री किती गाड्या पार्किंग असतात. आपली काय पार्किंगची जागा बनवली आहे का?

**मा. सभापती :-**

रात्री अनेक गाड्या उभ्या असतात. आताही बघा कितीतरी बाहेरच्या गाड्या उभ्या असतात.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

दुसरे प्रायव्हेट व्हेइकल आपल्या महापालिकेशी संबंधीत नसतील तर ते आतमध्ये घेणारच नाही अशा सुचना दिल्या आहेत आणि असतील तर काढायला सांगतो.

**मा. सभापती :-**

सर ह्याची अंमलबजावणी कडक करा.

**प्रशांत दळवी :-**

दि. ०७/०७/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४२ :-**

**दि. ०७/०७/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ३८ :-**

दि. ०७/०७/२०१८ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, **अग्निशमन दलाच्या एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी.टी.एल.) या वाहनाचे अत्यावश्यक स्पेअर पार्टस् व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

**सुरेश खंडेलवाल :-**

मिरा भाईदर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागाचे ३९.०० मी. उंचीचे टी. टी. एल. वाहन हे मे. रोझनबाउर इंटरनॅशनल यांचेकडुन खरेदी करण्यात आले आहे. सदर वाहन दि. २२/०५/२०१२ रोजी अग्निशमन विभागाच्या ताफ्यात दाखल झाले असुन आजतागायत कार्यरत आहे. सदरचे वाहन हे अद्ययावत व संपुर्णतः विदेशी बनावटीचे असल्याने सदर वाहनाचे वेळच्यावेळी मेंटेनन्स होणे आवश्यक आहे. मे. रोझनबाउर या कंपनीने भारतात मेंटनन्स करिता अधिकृत केलेले मे. ॲनलॉन टेक्नॉलॉजी सोलुशन यांनी सदर वाहनाचे काही सुटे भाग कमकुवत झाले असल्याने ते लवकरात लवकर बदलणेबाबत कळविले आहे. सदर कमकुवत झालेले साहित्य निकामी झाल्यास वाहन नादुरुस्त अवस्थेत जाउन अग्निशमन विभागाची मोठी गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असल्याने व अग्निशमन विभागाकडे सद्यस्थितीत केवळ या बनावटीचे एकमेव वाहन उपलब्ध असल्याने शहरातील आगीच्या घटना पाहता सदर वाहन कायम सुसज्ज राहणे अत्यंत आवश्यक बाब आहे. सदर वाहन हे विदेशी बनावटीचे असुन विशिष्ट तंत्रज्ञानाचे आहे. सदर वाहनाचे सुटे भाग (स्पेअर पार्टस्) हे केवळ त्याच कंपनीत उत्पादीत केले जात असल्याने बाजारात इतरत्र उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे सदर वाहनाचे सुटे भाग (स्पेअर पार्टस्) हे त्यांचे कंपनीकडुनच खरेदी करावे लागतात. सदरचे साहित्य हे विदेशातुन आयात करावे लागत असल्याने साहित्य अग्निशमन विभागास प्राप्त होईपर्यंत मोठा कालावधी उलटुन जात असतो. सदर कालखंडात निकामी झालेला वाहनाचा पार्टस वेळीच उपलब्ध न झाल्याने त्याच्याशी संलग्न असलेला इतर कोणता पार्टस खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाब लक्षात घेता वाहनात बिघाड होवुन वाहन नादुरुस्त अवस्थेत जाणेपुर्वी मे. ॲनलॉन टेक्नॉलॉजी सोलुशन यांनी सुचविलेले वाहनाचे सुटे भाग आगाउ खरेदी करुन वाहनाची सर्व्हिसिंग केल्यास संभाव्य अडचणी टाळता येतील. त्याकरीता वाहनाचे अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करणे करिता मा. स्थायी समितीची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगपालिका अधिनियमातील प्रकरण ५(२)(२) अन्वये मा. स्थायी समिती सभे समोर ठेवण्यात येत आहे.

सदर वाहनांकरिता आवश्यक असणा-या स्पेअरपार्ट्स बाबतचा संपुर्ण तपशील खालिलप्रमाणे.

| Sr. No. | Item | Qty. | Rate (per Qty) | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Air Filter A0004300969 | 1 | 9,867.16/- | 9,867.16/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 02 | TS Filter A0000901551 | 1 | 2,277.40/- | 2,277.40/- |
| 03 | TS Part sets: Miscellaneous/ A9061800209 Replacement for A0001801709 | 1 | 5,196.72/- | 5,196.72/- |
| 04 | Filter A0004662804 | 1 | 3,914.06/- | 3,914.06/- |
| 05 | Pollen Filter A9738350147 | 1 | 6,008.56/- | 6,008.56/- |
| 06 | TS Filter Insert A0000901351 | 1 | 1,865.58/- | 1,865.58/- |
| 07 | Filter /A0002704598 Replacement for A0002703598 | 1 | 85250.28/- | 85250.28/- |
| 08 | Filter Element /A0040947404 Replacement for A0030949604 | 1 | 34733.30/- | 34733.30/- |
| 09 | Air Dryer Cartridgen for MB Chassis A0004295695 | 1 | 23647.20/- | 23647.20/- |
| 10 | Super Longtime grease 400g tube | 6 | 18,436.32/- | 18,436.32/- |
| 11 | silicone Oil | 1 | 109207.82/- | 109207.82/- |
| 12 | Grease for ladder set | 8 | 79296.00/- | 79296.00/- |
| 13 | Filter inlet for main hydraulic HAWE | 1 | 76954.88/- | 76954.88/- |
| 14 | Seal kit for high Pressure filter main hydraulic | 1 | 9156.80/- | 9156.80/- |
| 15 | filter water/fuel separator filter cartridge | 1 | 13,857.92/- | 13,857.92/- |
| 16 | Service kit for RS142015 Rosenbauer | 1 Set | 27,123.20/- | 27,123.20/- |
| 17 | Oil hydraulic AVIA for hydraulic or cool Oil for main hydraulic / Avia Bantleon PE -B 20 liter canister | liter 40 | 173,696.00/- | 173,696.00/- |
| 18 | Set of bulbs and fuses 24V | 2 | 88,976.72/- | 88,976.72/- |
| 19 | Ground pressure sensor unit complete CAN | 1 | 889,967.00/- | 889,967.00/- |
| 20 | Draw wire sensor | 1 | 152,610.58/- | 152,610.58/- |
| 21 | Switch inductive | 4 | 89,930.16/- | 89,930.16/- |
| 22 | Cage inclination sensor 3/15 grad | 1 | 192,676.30/- | 192,676.30/- |
| 23 | Socket for plug 4 poles | 50 | 229,215.00/- | 229,215.00/- |
| 24 | Plug AMP 24 Poles | 50 | 89,562.00/- | 89,562.00/- |
| 25 | Wire cable D6x960 | 4 | 110,802.00/- | 110,802.00/- |
| 26 | Wire cable D8x9030 | 1 | 37,892.16/- | 37,892.16/- |
| 27 | Wire cable D6x8915 | 4 | 110,188.40/- | 110,188.40/- |
| 28 | Microphone, longneck flex | 1 | 70,290.24 | 70,290.24 |
| 29 | Console for Barlock PA6 (Packing quantity = 750 pieces / packing ) | 2 | 531.00/- | 531.00/- |
| 30 | Cylinder head screw M 6 x 20 DIN 912 A4-70 | 4 | 509.76/- | 509.76/- |
| 31 | Washer 6,4 x18x1.6 DIN 9021 A4 | 4 | 509.76/- | 509.76/- |
| 32 | Hex nut M 6 DIN 985 A4 | 4 | 509.76/- | 509.76/- |
| 33 | Barlock top PA6 (Packing quantity = 750 pieces / packing ) | 2 | 464.92/- | 464.92/- |
| 34 | REFLECTOR CAP BARLOCK WHITE | 2 | 859.04/- | 859.04/- |
| 35 | Axle for bar - lock | 2 | 1,158.76/- | 1,158.76/- |
| 36 | Fastening D 6 for bar - Lock | 4 | 486.16/- | 486.16/- |
| 37 | Spring for bar -lock 13 x 2.5 Replacement for 000153-001 | 2 | 660.80/- | 660.80/- |
| 38 | Sleeve for Barlock-96 6.2 x 17.5 22.0 PA6 | 2 | 276.48/- | 276.48/- |
| 39 | Blind rivet 4.0-12.7 AVEX | 2 | 254.88/- | 254.88/- |
| 40 | Countersunk head tapping screw B4, 8 x 13 Din 7982 | 2 | 254.88/- | 254.88/- |
| 41 | Countersunk head tapping screw B4, 8 x 19 Din 7982 | 2 | 254.88/- | 254.88/- |
| 42 | Closing wedge for bar lock | 2 | 901.52/- | 901.52/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 43 | Handle Barlock 96 RBI D= L= 1500 light alloy EL replacement for 010707 | 1 | 16,213.20/- | 16,213.20/- |
| 44 | Cover for barlock made of plastic replacement for D 65019-001 | 2 | 689.12/- | 689.12/- |
| 45 | Marking light white LED | 2 | 31,222.00/- | 31,222.80/- |
| 46 | Proximity switch closer 5mm M18 w cable 5 m | 1 | 23,297.92/- | 23,297.92/- |
| 47 | cable 24x0.25mm2<br>length 3500 mm | 1 | 3339.40/- | 3339.40/- |
| 48 | Plug AMP 24 Poles | 2 | 3582.48/- | 3582.48/- |
| 49 | pin AMP style female 0.5-1.5mm2 | 50 | 6372.00/- | 6372.00/- |
| 50 | Rectangular Flange Socket AMP Size 23/24Poles | 2 | 7372.80/- | 7372.80/- |
| 51 | Pin AMP style male tinplated | 50 | 6,372.00/- | 6,372.00/- |
| 53 | Rubber Grommet with heat shrinkable Molding | 6 | 30267.00/- | 30267.00/- |
| 54 | Gasket ring for socket AMP | 2 | 1522.20/- | 1522.20/- |
| 55 | Fuel hose DN6 Replacement for 579448 | 2 meter | 2997.20/- | 2997.20/- |
| 56 | Hose clamp | 4 | 509.76/- | 509.76/- |
| 57 | Starter rope | 1 | 5960.64/- | 5960.64/- |
| 58 | Electronic Hand Searchlight CEAG SEB8 | 1 | 156,114.00/- | 156,114.00/- |
| 59 | Inside light thin lite white | 1 | 12,517.44/- | 12,517.44/- |
| 60 | Reversing light | 1 | 2094.50/- | 2094.50/- |
| 61 | Terminal box with cover | 1 | 217,669.88/- | 217,669.88/- |
| 62 | Bulb lamp 28V 1.2W base T5.5 | 12 | 9,515.52/- | 9,515.52/- |
| 63 | Hand rail fold away, RAL9006 | 1 | 173701.90/- | 173701.90/- |
| 64 | foot pedal | 2 | 55,552.00/- | 55,552.00/- |
| 65 | Transmission Oil GX 80W 90 (SAE90) 20 liter Canister | 60 | 133,812.00/- | 133,812.00/- |
| 66 | Oil hydraulic shell for main hydraulic 20 liter canister | 40<br>Liters | 36,060.80/- | 36,060.80/- |
| 67 | Coolant G 40 (red) 5 liter canister | 8 | 101,470.56/- | 101,470.56/- |
| 68 | Cotton Waste | 20 kg | 22,092.00/- | 22,092.00/- |
| 69 | WD 40 spray | 5 | 15,511.10/- | 15,511.10/- |
| 70 | Cable Tie | Packets<br>5 | 15,511.10/- | 15,511.10/- |
| 71 | Battery RS 14 | 1 | 8615.68/- | 8615.68/- |
| 72 | Engine Oil | 35 liter | 31,801.00/- | 31,801.00/- |
| 73 | Oil hydraulic shell for main hydraulic only in 209 L barrel available | Barrel<br>1 | 2,20,632.86/- | 2,20,632.86/- |
| | | | **freight charges** | **143060.00** |
| | | | **GST on freight @ 28 %** | **40,056.800** |
| | | | **Total freight Including GST** | **183116.80** |
| | | | **Cost of Spart Parts Including GST** | **4111745.42** |
| | | | **Freight charges including GST** | **183,116.80** |
| | | | **GRAND TOTAL** | **4,294,862.22** |
| | | | **Round Off TOTAL** | **42,94,862.00** |

मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोलुशन प्रा. लि. यांनी सादर केलेल्या उपरोक्त नमुद दरानुसार वरील नमुद साहित्य खरेदी करीता रु. ४२,९४,८६२/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात

साधनसामुग्री व भंडारे या लेखाशिर्षाअंतर्गत रु. २००.०० लाख इतकी तरतुद करण्यात आली असुन सदर तरतुदीतुन आजमितीपर्यत कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

तरी अग्निशमन विभागाची आवश्यकता लक्षात घेता व सदरचा प्रस्ताव हा अत्यावश्यक सेवेचा असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५(२)(२) अन्वये असल्याने अग्निशमन विभागातील टी.टी.एल वाहनाकरीता अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करीता वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार रु. ४२,९४,८६२/- इतक्या खर्चास ही मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय हा प्रशासकीय विषय आहे. अग्निशमन विभागाला गाड्याचे स्पेअर पार्टस खरेदी करण्यासाठी ४४ लाखाची गरज आहे. अग्निशमन हा स्वतंत्र अर्थसंकल्प आहे. त्याचा वेगळा बजेट आहे. स्मशान भूमी आणि भांडार ह्या लेखाशिर्षातून २ कोटी रुपये वर्ग करता ह्याला पुर्नःविनियोजनची गरज नाही.

**मा. सभापती :-**

पुर्नःविनियोजन करायचे नाही. साधनसामुग्री व भांडार ही एक तरतुद आहे. ह्या तरतुदीतून खर्च केला आहे. पुर्नःविनियोजन नाही.

**जुबेर इनामदार :-**

माझा ठरावाला विरोध आहे असे मी बोलणार नाही. अत्यावश्यक सेवा आहे. अग्निशमनचा विषय असायला पाहिजे. खरतर एवढ्या वस्तू विकत घेतात तर ठेवणार कुठे त्या परमेश्वराला माहिती नटबॉल कुठे फेकून देतील. ५० लाखाची तरतूद आहे म्हणून वापरायची. विषय असा आहे की अग्निशमन हा स्वतंत्र अंदाजपत्रक अर्थसंकल्पामध्ये तयार करतो. तुम्हाला एका डिपार्टमेंटमधून दुसऱ्या डिपार्टमेंटमध्ये वर्ग करायला लागेल. “अ” बजेटमधून तुमच्या अग्निशमनच्या बजेटमध्ये वर्ग केले पाहिजे. ऑडीटरनी सांगावे हे करता येईल त्यांनी सांगितले तर विषय संपला. आपल्याकडे ऑडिटचे मोठमोठे ग्रंथ येतात आणि ताशोरे ओढले जातात. प्रशासकीय कामकाजावर. विभागीय आयुक्तांना विचारा ते बोलतात मला ह्याच्यातले काहीच माहित नाही.

**प्रकाश बोराडे :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो साहेब हे सर्व्हिसिंगसाठी पार्ट मागवले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मी तुमच्या नटबॉल बद्दल विचारत नाही. तुम्हाला काय मागवायचे ते मागवा. आल्यानंतर कुठे फेकून देणार ते आम्हाला माहित नाही. विषय तो नाही मी तुम्हाला त्याच्यातल्या आर्थिक बाबी विचारल्या. अग्निशमनचा अंदाजपत्रक हा स्वतंत्र आहे. तुम्ही “अ” अंदाजपत्रकामधून अग्निशमनकडे पैसे वर्ग करता भांडार व साधनसामुग्री ह्या विभागाकडून पैसे वर्ग करता. हे करताना पुर्नःविनियोजनची गरज नाही का? हा प्रशासकीय विषय आहे. प्रशासनाने किंवा ऑडीटरनी ह्याचे उत्तर द्यावे. फायर डिपार्टमेंट उत्तर देऊ शकत नाही. करता येईल का?

**प्रकाश बोराडे :-**

अग्निशमनमध्ये भांडार व साधनसामुग्री हा स्वतंत्र विषय आहे.

**जुबेर इनामदार :-**

तुमचा असेल पण दोन कोटी रुपये तुम्ही कुठून वर्ग करता. तुमच्या स्वतःच्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद नाही. आम्हाला माहित नाही. तुम्ही गोषवाऱ्यामध्येच दिले आहे.

**मा. सभापती :-**

मिरा भाईंदर महापालिका अग्निशमन अंदाजपत्रकामध्ये पान क्र. ५ मध्ये साधनसामग्री व भांडार ह्याची खरेदी दोन कोटी रुपये ह्याच्यामधून ह्यांनी खरेदी केलेले आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ४३ :-**

**अग्निशमन दलाच्या एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी.टी.एल.) या वाहनाचे अत्यावश्यक स्पेअर पार्टस् व इतर साहित्य खरेदी करणेबाबत.**

**ठराव क्र. ३९ :-**

मिरा भाईदर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागाचे ३९.०० मी. उंचीचे टी. टी. एल. वाहन हे मे. रोझनबाउर इंटरनॅशनल यांचेकडुन खरेदी करण्यात आले आहे. सदर वाहन दि. २२/०५/२०१२ रोजी अग्निशमन विभागाच्या ताफ्यात दाखल झाले असुन आजतागायत कार्यरत आहे. सदरचे वाहन हे अद्ययावत व संपुर्णतः विदेशी बनावटीचे असल्याने सदर वाहनाचे वेळच्यावेळी मेंटेनन्स होणे आवश्यक आहे. मे. रोझनबाउर या कंपनीने भारतात मेंटनन्स करिता अधिकृत केलेले मे. ॲनलॉन टेक्नॉलॉजी सोलुशन यांनी सदर वाहनाचे काही सुटे भाग कमकुवत झाले असल्याने ते लवकरात लवकर बदलणेबाबत कळविले आहे. सदर कमकुवत झालेले साहित्य निकामी झाल्यास वाहन नादुरुस्त अवस्थेत जाउन अग्निशमन विभागाची मोठी गैरसोय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अग्निशमन विभाग ही अत्यावश्यक सेवा असल्याने व अग्निशमन विभागाकडे सद्यस्थितीत केवळ या बनावटीचे एकमेव वाहन उपलब्ध असल्याने शहरातील आगीच्या घटना पाहता सदर वाहन कायम सुसज्ज राहणे अत्यंत आवश्यक बाब आहे. सदर वाहन हे विदेशी बनावटीचे असुन विशिष्ट तंत्रज्ञानाचे आहे. सदर वाहनाचे सुटे भाग (स्पेअर पार्टस्) हे केवळ त्याच कंपनीत उत्पादीत केले जात असल्याने बाजारात इतरत्र उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे सदर वाहनाचे सुटे भाग (स्पेअर पार्टस्) हे त्यांचे कंपनीकडुनच खरेदी करावे लागतात. सदरचे साहित्य हे विदेशातुन आयात करावे लागत असल्याने साहित्य अग्निशमन विभागास प्राप्त होईपर्यंत मोठा कालावधी उलटुन जात असतो. सदर कालखंडात निकामी झालेला वाहनाचा पार्टस वेळीच उपलब्ध न झाल्याने त्याच्याशी संलग्न असलेला इतर कोणता पार्टस खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाब लक्षात घेता वाहनात बिघाड होवुन वाहन नादुरुस्त अवस्थेत जाणेपुर्वी मे. ॲनलॉन टेक्नॉलॉजी सोलुशन यांनी सुचविलेले वाहनाचे सुटे भाग आगाउ खरेदी करुन वाहनाची सर्व्हिसिंग केल्यास संभाव्य अडचणी टाळता येतील. त्याकरीता वाहनाचे अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करणे करिता मा. स्थायी समितीची आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगपालिका अधिनियमातील प्रकरण ५(२)(२) अन्वये मा. स्थायी समिती सभे समोर ठेवण्यात येत आहे.

सदर वाहनांकरिता आवश्यक असणा-या स्पेअरपार्ट्स बाबतचा संपुर्ण तपशील खालिलप्रमाणे.

| Sr. No. | Item | Qty. | Rate (per Qty) | Total Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Air Filter A0004300969 | 1 | 9,867.16/- | 9,867.16/- |
| 02 | TS Filter A0000901551 | 1 | 2,277.40/- | 2,277.40/- |
| 03 | TS Part sets: Miscellaneous/ A9061800209 Replacement for A0001801709 | 1 | 5,196.72/- | 5,196.72/- |
| 04 | Filter A0004662804 | 1 | 3,914.06/- | 3,914.06/- |
| 05 | Pollen Filter A9738350147 | 1 | 6,008.56/- | 6,008.56/- |
| 06 | TS Filter Insert A0000901351 | 1 | 1,865.58/- | 1,865.58/- |
| 07 | Filter /A0002704598 Replacement for A0002703598 | 1 | 85250.28/- | 85250.28/- |
| 08 | Filter Element /A0040947404 Replacement for A0030949604 | 1 | 34733.30/- | 34733.30/- |
| 09 | Air Dryer Cartridgen for MB Chassis A0004295695 | 1 | 23647.20/- | 23647.20/- |
| 10 | Super Longtime grease 400g tube | 6 | 18,436.32/- | 18,436.32/- |
| 11 | silicone Oil | 1 | 109207.82/- | 109207.82/- |
| 12 | Grease for ladder set | 8 | 79296.00/- | 79296.00/- |
| 13 | Filter inlet for main hydraulic HAWE | 1 | 76954.88/- | 76954.88/- |
| 14 | Seal kit for high Pressure filter main hydraulic | 1 | 9156.80/- | 9156.80/- |
| 15 | filter water/fuel separator filter cartridge | 1 | 13,857.92/- | 13,857.92/- |
| 16 | Service kit for RS142015 Rosenbauer | 1 Set | 27,123.20/- | 27,123.20/- |
| 17 | Oil hydraulic AVIA for hydraulic or cool Oil for main hydraulic / Avia Bantleon PE -B 20 liter | liter 40 | 173,696.00/- | 173,696.00/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | canister | | | |
| 18 | Set of bulbs and fuses 24V | 2 | 88,976.72/- | 88,976.72/- |
| 19 | Ground pressure sensor unit complete CAN | 1 | 889,967.00/- | 889,967.00/- |
| 20 | Draw wire sensor | 1 | 152,610.58/- | 152,610.58/- |
| 21 | Switch inductive | 4 | 89,930.16/- | 89,930.16/- |
| 22 | Cage inclination sensor 3/15 grad | 1 | 192,676.30/- | 192,676.30/- |
| 23 | Socket for plug 4 poles | 50 | 229,215.00/- | 229,215.00/- |
| 24 | Plug AMP 24 Poles | 50 | 89,562.00/- | 89,562.00/- |
| 25 | Wire cable D6x960 | 4 | 110,802.00/- | 110,802.00/- |
| 26 | Wire cable D8x9030 | 1 | 37,892.16/- | 37,892.16/- |
| 27 | Wire cable D6x8915 | 4 | 110,188.40/- | 110,188.40/- |
| 28 | Microphone, longneck flex | 1 | 70,290.24 | 70,290.24 |
| 29 | Console for Barlock PA6 (Packing quantity = 750 pieces / packing ) | 2 | 531.00/- | 531.00/- |
| 30 | Cylinder head screw M 6 x 20 DIN 912 A4-70 | 4 | 509.76/- | 509.76/- |
| 31 | Washer 6,4 x18x1.6 DIN 9021 A4 | 4 | 509.76/- | 509.76/- |
| 32 | Hex nut M 6 DIN 985 A4 | 4 | 509.76/- | 509.76/- |
| 33 | Barlock top PA6 (Packing quantity = 750 pieces / packing ) | 2 | 464.92/- | 464.92/- |
| 34 | REFLECTOR CAP BARLOCK WHITE | 2 | 859.04/- | 859.04/- |
| 35 | Axle for bar - lock | 2 | 1,158.76/- | 1,158.76/- |
| 36 | Fastening D 6 for bar - Lock | 4 | 486.16/- | 486.16/- |
| 37 | Spring for bar -lock 13 x 2.5 Replacement for 000153-001 | 2 | 660.80/- | 660.80/- |
| 38 | Sleeve for Barlock-96<br>6.2 x 17.5 22.0 PA6 | 2 | 276.48/- | 276.48/- |
| 39 | Blind rivet 4.0-12.7 AVEX | 2 | 254.88/- | 254.88/- |
| 40 | Countersunk head tapping screw B4, 8 x 13 Din 7982 | 2 | 254.88/- | 254.88/- |
| 41 | Countersunk head tapping screw B4, 8 x 19 Din 7982 | 2 | 254.88/- | 254.88/- |
| 42 | Closing wedge for bar lock | 2 | 901.52/- | 901.52/- |
| 43 | Handle Barlock 96 RBI D= L= 1500 light alloy EL replacement for 010707 | 1 | 16,213.20/- | 16,213.20/- |
| 44 | Cover for barlock made of plastic replacement for D 65019-001 | 2 | 689.12/- | 689.12/- |
| 45 | Marking light white LED | 2 | 31,222.00/- | 31,222.80/- |
| 46 | Proximity switch closer 5mm M18 w cable 5 m | 1 | 23,297.92/- | 23,297.92/- |
| 47 | cable 24x0.25mm2<br>length 3500 mm | 1 | 3339.40/- | 3339.40/- |
| 48 | Plug AMP 24 Poles | 2 | 3582.48/- | 3582.48/- |
| 49 | pin AMP style female 0.5-1.5mm2 | 50 | 6372.00/- | 6372.00/- |
| 50 | Rectangular Flange Socket AMP Size 23/24Poles | 2 | 7372.80/- | 7372.80/- |
| 51 | Pin AMP style male tinplated | 50 | 6,372.00/- | 6,372.00/- |
| 53 | Rubber Grommet with heat shrinkable Molding | 6 | 30267.00/- | 30267.00/- |
| 54 | Gasket ring for socket AMP | 2 | 1522.20/- | 1522.20/- |
| 55 | Fuel hose DN6 Replacement for 579448 | 2 meter | 2997.20/- | 2997.20/- |
| 56 | Hose clamp | 4 | 509.76/- | 509.76/- |
| 57 | Starter rope | 1 | 5960.64/- | 5960.64/- |
| 58 | Electronic Hand Searchlight CEAG SEB8 | 1 | 156,114.00/- | 156,114.00/- |
| 59 | Inside light thin lite white | 1 | 12,517.44/- | 12,517.44/- |
| 60 | Reversing light | 1 | 2094.50/- | 2094.50/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 61 | Terminal box with cover | 1 | 217,669.88/- | 217,669.88/- |
| 62 | Bulb lamp 28V 1.2W base T5.5 | 12 | 9,515.52/- | 9,515.52/- |
| 63 | Hand rail fold away, RAL9006 | 1 | 173701.90/- | 173701.90/- |
| 64 | foot pedal | 2 | 55,552.00/- | 55,552.00/- |
| 65 | Transmission Oil GX 80W 90 (SAE90) 20 liter Canister | 60 | 133,812.00/- | 133,812.00/- |
| 66 | Oil hydraulic shell for main hydraulic 20 liter canister | 40 Liters | 36,060.80/- | 36,060.80/- |
| 67 | Coolant G 40 (red) 5 liter canister | 8 | 101,470.56/- | 101,470.56/- |
| 68 | Cotton Waste | 20 kg | 22,092.00/- | 22,092.00/- |
| 69 | WD 40 spray | 5 | 15,511.10/- | 15,511.10/- |
| 70 | Cable Tie | Packets 5 | 15,511.10/- | 15,511.10/- |
| 71 | Battery RS 14 | 1 | 8615.68/- | 8615.68/- |
| 72 | Engine Oil | 35 liter | 31,801.00/- | 31,801.00/- |
| 73 | Oil hydraulic shell for main hydraulic only in 209 L barrel available | Barrel 1 | 2,20,632.86/- | 2,20,632.86/- |
| | | | **freight charges** | **143060.00** |
| | | | **GST on freight @ 28 %** | **40,056.800** |
| | | | **Total freight Including GST** | **183116.80** |
| | | | **Cost of Spart Parts Including GST** | **4111745.42** |
| | | | **Freight charges including GST** | **183,116.80** |
| | | | **GRAND TOTAL** | **4,294,862.22** |
| | | | **Round Off TOTAL** | **42,94,862.00** |

मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोलुशन प्रा. लि. यांनी सादर केलेल्या उपरोक्त नमुद दरानुसार वरील नमुद साहित्य खरेदी करीता रु. ४२,९४,८६२/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात साधनसामुग्री व भंडारे या लेखाशिर्षाअंतर्गत रु. २००.०० लाख इतकी तरतुद करण्यात आली असुन सदर तरतुदीतुन आजमितीपर्यत कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

तरी अग्निशमन विभागाची आवश्यकता लक्षात घेता व सदरचा प्रस्ताव हा अत्यावश्यक सेवेचा असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५(२)(२) अन्वये असल्याने अग्निशमन विभागातील टी.टी.एल वाहनाकरीता अत्यावश्यक स्पेअरपार्टस व इतर साहित्य खरेदी करीता वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार रु. ४२,९४,८६२/- इतक्या खर्चास ही मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४४, **शहरातील दैनंदिन निर्माण होणारा ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा वाहतुक करणेकामी मंजूर दरात अतिरिक्त वाहने घेणेबाबत.**

**मा. सभापती :-**

टेंडरची काय पोझिशन आहे.

**मा. उपायुक्त :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो त्या प्रि बीड मिटींग ३ तारखेला झाली. त्याच्या फायनान्शीयल प्रि बीड मिटींगमध्ये काही क्युरिज आल्या होत्या. त्या क्युरीजमुळे १५ दिवसाची मुदत वाढवून मागीतली म्हणजे १० ते १२ सप्टेंबरला ते फायनल होईल. दोन महिन्यात फायनल होईल.

**मा. सभापती :-**

आपण जर नविन गाड्या घेण्याचे त्यांना सांगितले तर नविन कॉन्ट्रॅक्टर हा नविन गाड्या घेऊ शकणार नाही. त्यांना बंदिस्त वाहन करायची आहेत. त्याचे टेंडर वर्कऑर्डर संपली आहे. आपण त्यांना एक्स्टेंशन करत नाही. त्यामुळे इमिजिएटली ऑर्डर जरी दिली तरी तो घेऊ शकणार नाही. त्यामुळे आमचे असे मत आहे की ते लवकरात लवकर करा. तुमचा १०० टक्के सुका कचरा ओला कचरा वेगळा झाला नाही.

**मा. उपायुक्त :-**

थोडीशी विनंती होती. वेगळा झाल्यावर लगेच टाकायला लागेल.

**प्रशांत दळवी :-**

गाड्याचे जे म्हणता एवढ्या गाड्या खरेदी करायच्या आहेत.

**मा. उपायुक्त :-**

खरेदी नाही भाड्याने.

**प्रशांत दळवी :-**

सुका कचरा, ओला कचरा त्याचे डब्बे पण पुरवणार होतो.

**मा. उपायुक्त :-**

त्याची वर्क ऑर्डर दिली आहे. १५-२० दिवसात येतील.

**प्रशांत दळवी :-**

तेही आले नाही. टेंडर पण संपले आहे. त्याची फेरनिविदा मागवून.

**मा. सभापती :-**

एक महिन्याच्या आत ती नविन निविदा कम्पलीट होणार आहे. दोन महिने पकडा.

**जुबेर इनामदार :-**

नविन निविदा प्रक्रियामध्ये १५ दिवसाचे एक्स्टेशन दिलेले आहे. तुमची निविदा चालू असतात. मधोमध परत हा नविन गाड्याची माग हे योग्य आहे का? कायद्यात तरी आहे का?

**मा. उपायुक्त :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो आपला प्लान्ट सुरु झालेला आहे. ओला कचरा सुका कचऱ्यासाठी प्रत्येक सोसायटीला वेगळी गाडी पाहिजे. प्रकल्प सुरु झाल्यामुळे सुक्या कचऱ्याची डिमांड वाढली आहे. स्वच्छ सर्वेक्षण ह्या वर्षी डिसेंबरमध्ये लवकर सुरु होणार त्याच्यानंतर ३ महिन्याचा डाटा ते मागवतात. हे टेंडर दोन महिन्यात होईल ह्याची गॅरेन्टी नाही. कारण कोणी कोर्टात गेले. गेल्यावर्षी १ वर्ष चालले जवळपास १ वर्षाने टेंडर फायनल झाले. दोन महिन्यात टेंडर झाले तर वेल ॲन्ड गूड आपण लगेच डिसकन्टीन्यू करतो. मुदत १-२ महिन्याची देतो. चुकून जर टेंडर फायनल झाले नाही तर ओला कचरा सुका कचरा जी वेगळी मोहिम होती ते स्वच्छ अभियानामध्ये स्वच्छ सर्वेक्षण २०१९ चालू होणार आहे. त्यासाठी आवश्यक आहे आपला प्लान्ट सुरु झाला आहे ते सुक्या कचऱ्याची डिमांड करतात. म्हणून दोन महिन्याची आम्हाला द्या नंतर विषय आपण वापस घेऊ.

**मा. सभापती :-**

एखादा कर्मचारी टेम्परारी महापालिकेमध्ये घेतला तर तो लगेच निघत नाही. एखाद्या वाहनाची ऑर्डर दिली तर तो कॉन्ट्रॅक्टर ते वाहन डिसकनेक्ट करत नाही ही संख्या वाढत जाते. तुमची टेंडरमध्ये एक्झीस्टींग संख्या किती होती. त्याच्यानंतर सुमारे एक दीड वर्षापूर्वी २४ वाहनांसाठी वर्क ऑर्डर दिली होती. ती २४ वाहन आली. अजून ३६ वाहन म्हणता ह्याची संख्या किती झाली आणि तुम्ही येणाऱ्या नविन टेंडरमध्ये एवढी संख्या आहे का? त्याचा गोषवाऱ्यामध्ये कुठेही उल्लेख केला नाही. गाड्या किती आहेत.

**मा. उपायुक्त :-**

१०३ गाड्या आहेत.

**मा. सभापती :-**

टोटल किती होतात. दीड वर्षापूर्वी २४ गाड्यांची ऑर्डर दिली.

**मा. उपायुक्त :-**

जवळपास १५० होतात.

**मा. सभापती :-**

१५० गाड्या उभ्या आहेत आणि येणाऱ्या बजेटमध्ये तुम्ही तर आणखी वाढवल्या तर गाड्यांची संख्या किती होईल. आपल्या महापालिकेमध्ये एक नियम आहे की एखादा कर्मचारी जर टेम्परारी इकडे लागला तर रिटायरमेंटपर्यंत इथेच राहतो. पानपट्टे साहेब हा फक्त खर्च वाढवण्याकरिता करु नका. जर ह्याची गरज असेल तर ठीक आहे. बाकी ह्याची गरज नाही. जर दुसऱ्या कॉन्ट्रॅक्टरला वर्क ऑर्डर दिली तर तो इमिजिएटली नविन गाड्या उपलब्ध करु शकणार नाही. त्या दिवशी उत्तनला मिटींग झाली त्यावेळी तुम्ही सांगितले आम्ही बंदीस्त गाड्या घेणार. उघड्या गाड्या नको जर तुम्ही आता उघड्या गाड्या दिल्या तर वाद निर्माण होईल काय गरज आहे.

**मा. उपायुक्त :-**

सॅग्रीगेशन होणार.

**मा. सभापती :-**

सॅग्रीगेशन २० टक्के पण झाले नाही. आता ३६ वाहन घेतली तर काय प्रॉब्लेम होईल. महापालिकेचा खर्च किती वाढतो. आजच्या पेपरमध्ये मला खंडेलवालनी दाखवले त्याच्यात क्लिअर म्हटले आहे. तुमच्या महापालिकेची स्थिती काय आहे. तुम्ही ३६ वाहन जर दिली ते चूकीचे आहे.

**मा. उपायुक्त :-**

महासभेत पण गोषवारा दिला होता.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती साहेब ७८ लाखाचा खर्च स्थायी समितीला ५० लाखाच्या वर अधिकारच नाहीत. महासभेला घेऊन जायला लागेल.

**सुरेश खंडेलवाल :-**

दोन कोटी मंजूर केले.

**जुबेर इनामदार :-**

कोणी मंजूर केले. तुम्हाला अधिकार नाही. तो शासनाचा निर्णय आहे.

**मा. सभापती :-**

हे महासभेने ठराव करुन स्टॅन्डिंगला अधिकार दिला होता. आपणच तो ठराव केला होता.

**जुबेर इनामदार :-**

आपण महासभेत ठराव करतो ते मंजूर होतात का? तसे करता येते का ऑडीटरनी सांगावे.

**सुरेश खंडेलवाल :-**

जोपर्यंत तो विखंडीत होऊन येत नाही किंवा विखंडीतला पाठवत नाही तोपर्यंत चालूच आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाला काही विषय असतात ते आपण मनमर्जीने करतो. नियम बदलतात असे नाही. नियम नियमच आहे. त्या बदलण्यासाठी कायदा पाहिजे.

**सुरेश खंडेलवाल :-**

तुम्ही बोलले म्हणून मी सांगितले की महासभेने स्टॅन्डिंगला दोन कोटीचे अधिकार दिले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

पुढचा विषय असा असेल तर महासभेसमोर जायला लागेल.

**प्रशांत दळवी :-**

महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणारा कचरा वाहतुक करणेकामी निविदा प्रसिध्द केली असुन निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच मंजूर निविदाधारकास वाहने उपलब्ध करण्यास आदेश दिल्यानंतर वाहने लगेच उपलब्ध होणार नसुन निविदाधारकास बंदीस्त वाहने उपलब्ध करणेस एक ते दोन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच निविदा संपली असल्याने निविदाधारकास कचरा वाहतुक करणे करीता एक ते दोन महिन्याकरीता नविन वाहने खरेदी करेल याची शंका वाटते. एक ते दीड वर्षापूर्वी २४ ते ३० वाहने कचरा वाहतुक करणेकरीता निविदेधारकास आदेश दिला होता. व नविन निविदेमध्ये प्रशासनाने कमी गाडयांचा प्रस्ताव दिला आहे.

त्यामुळे उपरोक्त बाबी प्रशासनाने गोषवाऱ्यात नमुद न केल्याने सविस्तर गोषवाऱ्यासह सदरचा विषय फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

फेरसादर करायचे कारण काय.

**प्रशांत दळवी :-**

टेंडर संपलेले आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर.

**प्रकरण क्र. ४४ :-**

**शहरातील दैनंदिन निर्माण होणारा ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा वाहतुक करणेकामी मंजूर दरात अतिरिक्त वाहने घेणेबाबत.**

**ठराव क्र. ४० :-**

महानगरपालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणारा कचरा वाहतुक करणेकामी निविदा प्रसिध्द केली असुन निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच मंजूर निविदाधारकास वाहने उपलब्ध करण्यास आदेश दिल्यानंतर वाहने लगेच उपलब्ध होणार नसुन निविदाधारकास बंदीस्त वाहने उपलब्ध करणेस एक ते दोन महिन्यांचा कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच निविदा संपली असल्याने निविदाधारकास कचरा वाहतुक करणे करीता एक ते दोन महिन्याकरीता नविन वाहने खरेदी करेल याची शंका वाटते. एक ते दीड वर्षापूर्वी २४ ते ३० वाहने कचरा वाहतुक करणेकरीता निविदेधारकास आदेश दिला होता. व नविन निविदेमध्ये प्रशासनाने कमी गाडयांचा प्रस्ताव दिला आहे.

त्यामुळे उपरोक्त बाबी प्रशासनाने गोषवाऱ्यात नमुद न केल्याने सविस्तर गोषवाऱ्यासह सदरचा विषय फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४५, **बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नळजोडणी मंजूर करणेसाठी धोरण ठरविणेबाबत.**

**सुरेश खंडेलवाल :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राचा विकास झपाटयाने होत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत अपुऱ्या पाणी पुरवठयामुळे दि.०४/१०/२०११ पासून नळजोडण्या देण्याचे बंद करण्यात आलेले होते. अतिरिक्त ७५ द.ल.लि. पाणी पुरवठा योजना अंशतः कार्यान्वित झाल्याने शहराच्या पाणी पुरवठयात वाढ झाल्याने दि.३०/०४/२०१७ पासून नविन जलजोडणी मंजूरी सुरु करण्यात आलेली आहे.

पाणी ही जिवनाश्यक बाब असल्याने अनधिकृत इमारतीत राहत असलेले नागरिक पाण्याशिवाय राहू शकत नाही हे उघड सत्य आहे. त्यामुळे सदर नागरिक चोरुन नळजोडण्या घेतात वा ज्या नळजोडण्या शेजारी आहेत त्यावरुन पाण्याचा वापर करतात. त्यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नळजोडणी मिळणेसाठी मागणी होत असल्याने प्रशासनाने अनधिकृत इमारतींना रो हाउस, बंगला याकरीता बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत, अशा मिळकतीना नविन नळ जोडणी मंजूरीसाठी धोरण ठरविण्याकरीता स्थायी समिती सभेत विषय आणलेला आहे. परंतु यामध्ये झोपडपट्टीधारकाचा कुठेही उल्लेख नाही.

झोपडपट्टीधारकाकरीता पालिकेतर्फे इतर मूलभूत गरजा उदा. रस्ते, गटार, स्ट्रीटलाईट, शौचालय, शाळा पूरविल्या जात आहेत. पाणीसुध्दा अतिआवश्यक मूलभ्डूत गरज असल्याने देणे आवश्यक आहे. पाणी

पुरवठा न केल्यास विहिरीचे किंवा टँकरचे खराब, दुषित पाणी दिल्यास रोगराई पसरण्याची संभवना आहे. त्यामुळे तेथील नागरीक आजारी पडल्याने पुन्हा महानगरपालिकेच्या हॉस्पीटल व डॉक्टरकडे उपचार करणे क्रमप्राप्त आहे. या सर्व बाबींचा आढावा घेवून प्रशासनातर्फे सविस्तर प्रस्ताव फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४५ :-**

**बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नळजोडणी मंजूर करणेसाठी धोरण ठरविणेबाबत.**

**ठराव क्र. ४१ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्राचा विकास झपाटयाने होत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत अपु-या पाणी पुरवठयामुळे दि.०४/१०/२०११ पासून नळजोडण्या देण्याचे बंद करण्यात आलेले होते. अतिरिक्त ७५ द.ल.लि. पाणी पुरवठा योजना अंशतः कार्यान्वित झाल्याने शहराच्या पाणी पुरवठयात वाढ झाल्याने दि.३०/०४/२०१७ पासून नविन जलजोडणी मंजूरी सुरु करण्यात आलेली आहे.

पाणी ही जिवनाश्यक बाब असल्याने अनधिकृत इमारतीत राहत असलेले नागरिक पाण्याशिवाय राहू शकत नाही हे उघड सत्य आहे. त्यामुळे सदर नागरिक चोरुन नळजोडण्या घेतात वा ज्या नळजोडण्या शेजारी आहेत त्यावरुन पाण्याचा वापर करतात. त्यामुळे महापालिकेचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत अशा मिळकतींना नळजोडणी मिळणेसाठी मागणी होत असल्याने प्रशासनाने अनधिकृत इमारतींना रो हाउस, बंगला याकरीता बांधकाम अधिकृततेचे पुरावे नाहीत, अशा मिळकतीना नविन नळ जोडणी मंजूरीसाठी धोरण ठरविण्याकरीता स्थायी समिती सभेत विषय आणलेला आहे. परंतु यामध्ये झोपडपट्टीधारकाचा कुठेही उल्लेख नाही.

झोपडपट्टीधारकाकरीता पालिकेतर्फे इतर मूलभूत गरजा उदा. रस्ते, गटार, स्ट्रीटलाईट, शौचालय, शाळा पूरविल्या जात आहेत. पाणीसुध्दा अतिआवश्यक मूलभूत गरज असल्याने देणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा न केल्यास विहिरीचे किंवा टँकरचे खराब, दुषित पाणी दिल्यास रोगराई पसरण्याची संभवना आहे. त्यामुळे तेथील नागरीक आजारी पडल्याने पुन्हा महानगरपालिकेच्या हॉस्पीटल व डॉक्टरकडे उपचार करणे क्रमप्राप्त आहे. या सर्व बाबींचा आढावा घेवून प्रशासनातर्फे सविस्तर प्रस्ताव फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४६, **बस ऑपरेटर नेमणूकीकरीता RPFD Document तयार करणे व Bid-Process management करीता सल्लगार नियुक्ती करणे बाबत.**

**सुरेश खंडेलवाल :-**

बस ऑपरेटरचा जो विषय आलेला आहे. दि. २७/४/२०१८ च्या स्थायी समितीच्या मिटींगमध्ये एक ठराव केला होता. त्या ठरावामध्ये आपण मागणी केली होती. आगार व्यवस्थापक व ऑपरेशन ह्यांचे नव्याने नविनीकरण करण्याबाबत त्यामध्ये जे सुरेश कलंत्रे हे जे डेपो मॅनेजर होते. त्याबाबत आम्ही ठराव केला होता की आम्ही त्यांना मंजुरी देत नाही. तरी आजपर्यंत ते कार्यरत आहेत असे आम्हाला समजले ह्याचा खुलासा करा. स्टॅन्डिंग मान्यता दिली नाही तरी ते कार्यरत का आहेत.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

ह्या बाबत आपण जो ठराव केला होता त्या अनुषंगाने मा. आयुक्तांसोबत चर्चा झाली होती. साहेबांचे म्हणणे होते एक्सेप्ट काही नाही आहे. जोपर्यंत दुसरे कोण करत नाही तोपर्यंत हे करण्याबाबत ते सभापतीबरोबर चर्चा करणार होते.

**सुरेश खंडेलवाल :-**

सभापती साहेब अशी काही चर्चा तुमच्याबरोबर झाली का?

**मा. सभापती :-**

आपण २७ एप्रिलला ठराव केला होता. पाच महिने होऊन गेले. पाच महिन्यात तुम्ही नविन व्यक्ती पण शोधली नाही. आणि परत तो विषय पण आणला नाही. त्या माणसाला पगार देऊन आपल्याकडे ठेवायची गरज काय? जर तुम्हाला हा माणूस कन्टीन्यूशनमध्ये पाहिजे होता तर तुम्ही पुन्हा प्रस्ताव आणायला पाहिजे होता. साहेब हे चुकीचे आहे. एकदा प्रस्ताव आणता आम्ही तो रिजेक्ट करतो आम्ही तो घेत नाही तरी सुध्दा तुम्ही त्या माणसाला ठेवता ह्याचे काय मतलब हे चुकीचे आहे. मग तुम्ही स्टॅन्डिंगची मिटींग कशाला घेता. आमच्याकडे कशाला ठराव आणता. काय गरज आहे. तुम्ही नविन सल्लागार नियुक्त करता ही बीड प्रोसेस करता. मागे आपण २५ लाखाची निविदा काढून एक सल्लागार आपण आणला होता. त्या सल्लागाराने जी.सी.सी. चे डॉक्यूमेंट बनवून दिले त्याला आपण २२ लाखापर्यंत पेमेन्ट केले ते पेमेन्ट वेस्ट गेले. पुन्हा आपण साडे पाच लाखाचा एक नविन सल्लागार आणतो. प्रशासनाने ह्या पैशाची जाण ठेवली पाहिजे. आपण जे काम करतो. आपले काय आहे मला सांगा. एखाद्या माणसाला सांगितले की जी.सी.सी. किंवा एन.सी.सी. धोरण ठरलेले आहे. आपण त्यांच्याकडून जी.सी.सी. डॉक्युमेंट बनवून घेतलेले आहे. एखादी बाटली विकत घेतली तर त्याला कॉस्टींग लागते. पण एखादी सर्विस आहे त्याला कॉस्टींग लागत नाही. आज जी.सी.सी. साठी त्यांनी एक डॉक्यूमेंट बनवले त्याच्यासाठी २५ लाख खर्च केले. तुम्ही त्यांना सांगायला पाहिजे की हे जी.सी.सी. चे टेंडर सक्सेस झाले नाही. आमची पॉलिसी चेंज झाली आहे. तुम्ही आम्हाला एन.सी.सी. बद्दल पण करुन द्या. त्यांनी करुन दिले पाहिजे. नविन कॉन्ट्रॅक्टर आणि सल्लागार नेमला कुठेतरी हे काम आपले आहे. आपले पैसे जाणार अशी तळमळ तुमच्या मनामध्ये ठेवली पाहिजे. तसे न करता तुम्ही आणखी खर्च करता. हे आमच्या मनाला लागते. आम्ही ह्या महापालिकेचे रहिवासी आणि सरंक्षक पण आहेत. कुठेतरी अननेसेसरी खर्च एक्स्ट्रा होतो हे चुकीचे आहे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

मा. सभापती महोदय बस ऑपरेटरसाठी जो सल्लागार नेमायचा होता. ज्या मोड्यूलवर बसेस चालवायच्या होत्या. त्यासाठी वर्ल्ड बँकेने आपल्याला सुचना केल्या होत्या. जी.सी.सी. मोड्यूलच्या संदर्भामध्ये आपण यू.एम.टी.सी. नावाची एक कन्सल्टन्सी फम नेमलेली होती. त्यांनी वेगवेगळ्या शक्यता तपासून एक डॉक्युमेंट बनवून दिले होते. त्यानुसार मागची प्रोसेस कम्पलीट केली होती. ॲग्रीमेन्टच्या ज्या अटीशर्ती होत्या त्यानुसार बीड प्रोसेस मॅनेजमेन्ट कम्पलीट केले असल्यामुळे त्यांना जेव्हा आम्ही बोललो की आता आम्हाला जी.सी.सी. बेसीक ऐवजी आम्हाला दुसऱ्या मोड्यूलवर हे करायचे आहे. तेव्हा ते बोलले त्याच्यासाठी आम्हाला वेगळे कॉस्टींग लागेल. वेगळी मॅन पावर यूज होईल. त्यामुळे आम्हाला त्याचे एक्स्ट्रा चार्जेस द्यावे लागतील. यू.एम.टी.सी. चे चार्जेस जे हेवी चार्जेस आहेत. त्यामुळे ते म्हणाले की कन्सल्टन्सी फम ऐवजी इन्डीव्ह्यूजवल फ्री लॉन्सींग करणारे कन्सल्टंन्ट जर तुम्ही नेमले तर तो सिंगल माणूस ते काम करतो. त्यामुळे नावाजलेल्या कंपनीमधून प्रॉडक्ट घेणे आणि दुसऱ्या ह्याच्याकडून घेणे ह्याच्यात कॉस्टींगमध्ये जो फरक येत होता तोच फरक इथे आलेला आहे. कारण यू.एम.टी.सी. ला पुन्हा दिले तर त्याच्या ॲग्रीमेन्टची मुदत संपली त्यामुळे आपण त्यांना फोर्स केला तरी त्यांचे म्हणणे आहे की त्याच्यामध्ये मॅन डेज वेस्ट होणार आहे. आम्हाला एक्स्ट्रा मॅनडेज लागणार आहे. त्यासाठी आम्हाला पैसे द्यावे लागतील.

**मा. सभापती :-**

साहेब त्यावेळी हीच सिस्टम वापरली असती तर ते २० लाख रुपये वाचले असते. त्यावेळी ती सिस्टम ॲडॉप्ट केली नाही आज डबल खर्च झाला.

**जुबेर इनामदार :-**

तो साडेपाच लाखमध्ये करतो. जी.सी.सी. सोप होत प्रशासन खर्च करणार होती. त्यांनी २५ लाख रुपये घेतले.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

एम.ओ.यू.डी. आणि वर्ल्ड बँकेने ज्या कन्सल्टन्सी फर्म सुचवल्या होत्या त्यांच्यामधून हे घेतले होते. त्यामधले एक्सपर्ट लोक आहेत.

**मा. सभापती :-**

सुरुवातीला भरपूर डॉक्युमेन्ट बनवले आहेत. सुरुवातीला हे सगळे कॉन्ट्रॅक्ट झाले. परंतु एवढा खर्च झाला नाही. परंतु आता सर्व सल्लागार नेमून ह्या पैशाची वाट लागत चालली आहे. आमची कुठेतरी तळमळ आहे तुम्ही हे पैसे वाचवा.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

बीड प्रोसेस मॅनेजमेन्ट हा कीचकट विषय आहे. आपल्या डॉक्युमेंट नंतर प्रत्येक गोष्ट कायद्याच्या कसोटीमध्ये करताना आणि त्याचे स्पेसिफिकेशन तपासणे त्याचे क्वेशन त्याचे आन्सर आणि प्रि बीडसाठी उत्तर जी प्रोसेस करायचे आहेत त्याची उत्तर आपल्याला द्यावी लागतात. त्याच्यासाठी एका सल्लागाराची गरज होती.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ह्याच्याआधी २५ लाख शासनानी आपल्याला दिले ना.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

वर्ल्ड बँकेच्या ह्याच्यात आपल्याला कन्सल्टंसीसाठी पैसे दिलेले आहेत. आय.टी.एस. साठी जी आपण निविदा काढली आहे त्याबाबत एक कन्सल्टन्ट नेमला आहे. त्याच्यासाठी कन्सल्टन्सीचे पैसे यूज करणार आहोत. वर्ल्ड बँकेकडून १२ कोटी अनुदान मिळणार आहे. त्याच्या अगोदर ७०-७५ लाख वेगवेगळ्या गोष्टीसाठी आहेत. कन्सल्टन्सीसाठी पण पैसे आहेत. परंतु ही जी आहे ही अत्यंत रिझनेबल आहे आणि आपल्याला बस पुढे चालू करण्यासाठी कन्सल्टन्ट नाही नेमला तर डॉक्युमेन्टमध्ये काही फ्लॉ राहतील त्या फ्लॉच्या आधारे आपल्याला आरबिट्रेशनमध्ये जाऊन आपल्यावरती मोठा क्लेम दाखल झालेला होता. तर अशी गोष्ट होऊ नये ही आमची अपेक्षा असल्यामुळे प्रशासनाने कन्सल्टन्ट नेमावा ह्यासाठी......................

**मा. सभापती :-**

ह्या कन्सल्टन्टला अपॉइन्ट केल्यानंतर भविष्यात काही प्रॉब्लेम येणार नाही आणि आला तर ........

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने स्वतःच्या पगारामधून द्यायचे.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

उद्याचे कुठे शाश्वत नसते कितीही मेडीकल फिल्ड म्हटले किंवा रोडवरती गाडीमध्ये सर्व सेफ्टी मेजर असल्या तर कोणी कोणाची हमी देऊ शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

जाणूनबुजून आपण अपघात घडवून आणतो. तो परत करु नका. परिवहनची परिस्थिती एकदम बिकट आहे. शहराचा सर्वात मोठा ज्वलंत विषय आहे तो.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आपल्याला चांगल्या पध्दतीने बस ऑपरेट करण्यासाठी.............

**जुबेर इनामदार :-**

चांगल्या बसेस तुमच्याकडे शिल्लक आहेत का?

**प्रशांत दळवी :-**

महानगरपालिका परिवहन सेवेचे धोरण ठरविणे कामी मा . महासभा ठराव क्र. १५, दि.०२/०५/२०१८ अन्वये मा. आयुक्त यांनी मनपा . पदाधिकारी यांच्या समवेत बैठक घेऊन बैठकीच्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव पारीत केला आहे.

मा. महासभेच्या उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने दि . ११/०७/२०१८ रोजी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सर्व पदाधिकारी, गटनेते व संबंधित अधिकारी यांचे समवेत बैठक घेण्यात आली . सदर बैठकीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवा चालविणेसाठी NCC with Viable Gap Funding तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करणेबाबत निर्णय झालेला असून तातडीने निविदा दस्ताऐवज तयार करून निविदा प्रक्रिया करण्यासाठी मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बस चालविणे करीता NCC with Viable Gap Funding तत्वावर बस ऑपरेटर नियुक्तीसाठी निविदा दस्ताऐवज तयार करणे , प्री-बीड मिटींगला उपस्थित राहून प्राप्त Queries वरील Response तयार करणे, प्राप्त निविदांची तांत्रिक कागदपत्रे तपासणे, प्राप्त दरांची व्यवहार्यता तपासणे, करारनामा अटीशर्ती तयार करणे आदी कामांसाठी त्या क्षेत्रातील तज्ञ (Expart) व्यक्ती सल्लागार म्हणुन तातडीने नियुक्ती करणे आवश्यक आहे.त्याकरीता मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेससाठी बस ऑपरेटर नियुक्तीकरीता तातडीने निविदा मागविणे आवश्यक असल्याने सल्लागाराची नियुक्ती तातडीने करणे गरजेचे आहे. त्यामुळे याकरीता परिवहन क्षेत्रातील तज्ञ श्री. राहुल नांगीया यांना दि . १७/०७/२०१८ रोजी ई-मेलद्वारे प्रस्ताव सादर करणेसाठी कळविण्यात आले होते . त्यानुसार दि.१८/०७/२०१८ रोजी श्री. राहुल नांगीया यांनी सविस्तर प्रस्ताव सादर केला होता . त्यामध्ये त्यांनी सल्लागार फी रक्कम रु.७.०० लक्ष (GST व प्रवास खर्च मनपा.कडून वेगळा अदा करावा लागेल) असा प्रस्ताव दिला होता. परंतू यासंदर्भात परिवहन व्यवस्थापक यांनी त्यांचेशी भ्रमणध्वनीवर चर्चा करून दरामध्ये वाटाघाटी करून सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत सुचित केले होते. त्याप्रमाणे श्री. राहुल नांगीया M/s.True Worth Consultancy Services यांनी रु. ५.५० लक्ष (प्रवास खर्चासह GST वगळून) इतकी अंतिम सल्लागार फी मागणी केली आहे.

Preparation of request for proposal (RFP) Document and Bid process management for selection of Bus Operator कामी श्री. राहुल नांगीया, M/s. True Worth Consultancy Sevices यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेसाठी येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) नुसार ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. साहेब जो २७/४ ला ठराव केला होता सुरेश कलंत्री त्यांना आम्ही मुदतवाढ दिली नव्हती. त्या माणसाने तिकडे काम करु नये आणि त्याचा पगार पण काढू नका.

**जुबेर इनामदार :-**

हा सल्लागार नेमायच्या आधी शासनाचा निर्णय तरी घ्या की ह्याच्या आधी झालेल्या निविदाचे काय करायचे. जी तुम्ही निविदा प्रक्रिया केलेली आहे त्याचा पाठपुरावा करा.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

मागच्या वेळी पदाधिका-यांची बैठक झाली होती. ते फायनल करुन आम्ही असे करत आहोत. ह्याबाबत शासनाला आम्ही............

**जुबेर इनामदार :-**

ह्याच्याआधी तुम्ही निविदा प्रक्रिया केली. निविदा प्रक्रिया पूर्ण झाली तो शासनाकडे गेला. तुम्ही शासनाकडे गेलात. शासनाचा निर्णय आला नाही ही निविदा प्रक्रिया पूर्ण करायच्या वेळी तो शासनाकडे गेला त्याने हा विषय न्यायप्रविष्ठ केला. तेव्हा तुमचे साडेपाच लाख रुपये बुडाले. हा सल्लागार तुम्हाला सल्ला देणार आणि जाणार. तुम्हाला एक ग्रंथ तयार करुन देणार आणि जाणार. विषय न्यायप्रविष्ठ झाला तर तो जाऊ शकतो. त्याला अधिकार आहे. ह्याच्या आधी केलेल्या निविदावर शासनाचा निर्णय घ्या की आम्ही नविन निविदा प्रक्रिया करायची की नाही करायची. शासनाकडून मार्गदर्शन कसे नाही येणार. मा. आयुक्तांनी तिकडे जाऊन बसायला पाहिजे. आम्हाला ह्याचे उत्तर द्या नाही तर असतील तर आम्ही देतो. माहिती अधिकारमध्ये असे तुम्ही कसे उत्तर देऊ शकता. ह्या विषयाचे प्रशासकीय उत्तर द्या. शासन उत्तर देत नाही मंत्रालयात पारदर्शक कारभार चालू आहे.

**मा. सभापती :-**

साहेब जिथे तुम्हाला गरज लागते तिथे आम्ही नगरसेवक जातो ना. तुम्हाला लिमीटेशन आहे. आम्हाला कुठे लिमीटेशन नाही. कुठल्या डिपार्टमेंटला कुठले अधिकारी, कुठले मंत्री तुम्हाला कुठेही अडचण आली तर तुम्ही आम्हाला सांगा. आम्ही तिकडे बसून काम करतो.

**जुबेर इनामदार :-**

नगरविकास खात्याचे मुख्य मुख्यमंत्री आहेत आणि ते बोलतात माझा पारदर्शक कारभार आहे.

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४६ :-**

**बस ऑपरेटर नेमणूकीकरीता RPFD Document तयार करणे व Bid-Process management करीता सल्लगार नियुक्ती करणे बाबत.**

**ठराव क्र. ४२ :-**

महानगरपालिका परिवहन सेवेचे धोरण ठरविणे कामी मा . महासभा ठराव क्र. १५, दि.०२/०५/२०१८ अन्वये मा. आयुक्त यांनी मनपा . पदाधिकारी यांच्या समवेत बैठक घेऊन बैठकीच्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव पारीत केला आहे.

मा. महासभेच्या उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने दि . ११/०७/२०१८ रोजी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सर्व पदाधिकारी, गटनेते व संबंधित अधिकारी यांचे समवेत बैठक घेण्यात आली . सदर बैठकीमध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवा चालविणेसाठी NCC with Viable Gap Funding तत्वावर बस ऑपरेटर नियुक्त करणेबाबत निर्णय झालेला असून तातडीने निविदा दस्ताऐवज तयार करून निविदा प्रक्रिया करण्यासाठी मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन सेवेच्या बस चालविणे करीता NCC with Viable Gap Funding तत्वावर बस ऑपरेटर नियुक्तीसाठी निविदा दस्ताऐवज तयार करणे , प्री-बीड मिटींगला उपस्थित राहून प्राप्त Queries वरील Response तयार करणे, प्राप्त निविदांची तांत्रिक कागदपत्रे तपासणे, प्राप्त दरांची व्यवहार्यता तपासणे, करारनामा अटीशर्ती तयार करणे आदी कामांसाठी त्या क्षेत्रातील तज्ञ (Expart) व्यक्ती सल्लागार म्हणुन तातडीने नियुक्ती करणे आवश्यक आहे.त्याकरीता मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये मंजुरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या बसेससाठी बस ऑपरेटर नियुक्तीकरीता तातडीने निविदा मागविणे आवश्यक असल्याने सल्लागाराची नियुक्ती तातडीने करणे गरजेचे आहे. त्यामुळे याकरीता परिवहन क्षेत्रातील तज्ञ श्री. राहुल नांगीया यांना दि . १७/०७/२०१८ रोजी ई-मेलद्वारे प्रस्ताव सादर करणेसाठी कळविण्यात आले होते . त्यानुसार दि.१८/०७/२०१८ रोजी श्री. राहुल नांगीया यांनी सविस्तर प्रस्ताव सादर केला होता . त्यामध्ये त्यांनी सल्लागार फी रक्कम रु.७.०० लक्ष (GST व प्रवास खर्च मनपा.कडून वेगळा अदा करावा लागेल) असा प्रस्ताव दिला होता. परंतू यासंदर्भात परिवहन व्यवस्थापक यांनी त्यांचेशी भ्रमणध्वनीवर चर्चा करून दरामध्ये वाटाघाटी करून सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत सुचित केले होते. त्याप्रमाणे श्री. राहुल नांगीया M/s.True Worth Consultancy Services यांनी रु. ५.५० लक्ष (प्रवास खर्चासह GST वगळून) इतकी अंतिम सल्लागार फी मागणी केली आहे.

Preparation of request for proposal (RFP) Document and Bid process management for selection of Bus Operator कामी श्री. राहुल नांगीया, M/s. True Worth Consultancy Sevices यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेसाठी येणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ५ (२) (२) नुसार ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्री. सुरेश खंडेलवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४७, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन नळजोडणी संगणक अज्ञावलीची वाढ , सपोर्ट, हॉस्टींग व स्टोरेज इत्यादी आवश्यक कामे मे.** NP Infoserve Technologies Pvt Ltd **या संस्थेमार्फत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये मान्यता देणेबाबत.**

**अनिल विराणी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन नळ जोडणी मंजूरी करण्याकरीता नविन संगणक आज्ञावली खरेदी केली असुन त्याप्रमाणे नविन नळ कनेक्शन शहरात दिले गेले आहे. व आता नळ कनेक्शन किती प्रलंबित आहे, तसेच संगणक आज्ञावलीत कुठला बदल करावयाचा आहे, व या आज्ञावलीत कोणते अडथळे आले आहेत, याबाबत प्रशासनाने गोषवाऱ्यात नमूद केले नाही. सादर संगणक आज्ञावलीची खरेदी रक्कम नमूद नाही. वास्तविक संगणक आज्ञावलीत बदल किंवा Updating व इतर कामे त्यांनीच निशुल्क

करणे अपेक्षित आहे. खरेदी करताना व करारनाम्यातील अटीशर्तीचा पण कुठेही उल्लेख नसल्याने प्रशासनाने सविस्तर गोषवारा फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

म्हसाळ साहेब ऑनलाईन फॉर्म स्विकारायचे पध्दत आहे. आणि त्या संचिकांचे ऑनलाईन काय स्टेटस आहे. ते ज्यांनी अर्ज केला आहे त्यालाच समजून येईल. त्याला जो लॉगीन आयडी आहे तो ओपन केला पाहिजे. केलेल्या अर्जाचे काय स्टेटस आहे ते जर आम्हाला बघायचे असतील तर बघता येतील. ह्याला लॉगीन करायची गरजच नाही. त्याला सिंगल लॉगीनच पाहिजे. ह्याला ओपन ठेवायला पाहिजे. अर्ज टाकल्यानंतर त्या सॉफ्टवेअरनी तुमच्या फाईलचे स्टेटस कुठे आहे ते कोणालाही दिसले पाहिजे किंवा बघता आली पाहिजे. ह्याच्या गोपिनियतेची काही गरज नाही. त्याच्यामुळे पाणी पुरवठा विभागामध्ये भ्रष्टाचार वाढत चालला आहे.

**सय्यद नुरजहाँ नजर हुसैन :-**

गोपनीय ठेऊन फायदा काय आहे.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला बघायचे आहे तर बघता येत नाही.

**मा. सभापती :-**

तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. मी जर अर्ज केला तर माझ्या फाईलचे स्टेटस मला कळणे गरजेचे आहे. ते कळले नाही तर मी फॉलो अप कुठे करणार? मी तेच बघत बसणार वर्क इन प्रोसेस. एका वर्षाच्या आतमध्ये पुन्हा १० लाख रुपये खर्च करतो. एक वर्ष पण झाले नाही आणि आपले मोस्टली कनेक्शन सॅक्शन झाले आहेत. एखाद दुसर राहील असेल पुन्हा सर १० लाखाचा खर्च ऑनलाईन वॉटर कनेक्शन पुन्हा सपोर्ट ऑफ ऑल युजर्स ॲन्ड कॉल मास्टर आय डी साहेब काय चालले आहे. ह्याच्यात लक्ष द्या. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४७ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन नळजोडणी संगणक अज्ञावलीची वाढ , सपोर्ट, हॉस्टींग व स्टोरेज इत्यादी आवश्यक कामे मे .** NP Infoserve Technologies Pvt Ltd **या संस्थेमार्फत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) मधील प्रकरण ५(२)(२) अन्वये मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. ४३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नविन नळ जोडणी मंजूरी करण्याकरीता नविन संगणक आज्ञावली खरेदी केली असुन त्याप्रमाणे नविन नळ कनेक्शन शहरात दिले गेले आहे. व आता नळ कनेक्शन किती प्रलंबित आहे, तसेच संगणक आज्ञावलीत कुठला बदल करावयाचा आहे, व या आज्ञावलीत कोणते अडथळे आले आहेत, याबाबत प्रशासनाने गोषवाऱ्यात नमूद केले नाही. सादर संगणक आज्ञावलीची खरेदी रक्कम नमूद नाही. वास्तविक संगणक आज्ञावलीत बदल किंवा Updating व इतर कामे त्यांनीच निशुल्क करणे अपेक्षित आहे. खरेदी करताना व करारनाम्यातील अटीशर्तीचा पण कुठेही उल्लेख नसल्याने प्रशासनाने सविस्तर गोषवारा फेर सादर करावा, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल विराणी अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४८, **लेखापरिक्षण विभागासाठी मानधनावर नेमलेल्या श्री . मधुकर सुर्वे , लेखाधिकारी व श्री. प्रभाकर वर्तक, लेखाधिकारी यांच्या नियुक्तीचे नुतनीकरण करणेबाबत.**

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब हा विषय स्टॅन्डिंगमध्ये आला होता आणि आपण फेटाळला होता. आपण असे बोलले की जे जुने आहेत त्याच्याकडून करुन घ्या. ह्याच्यामध्ये आधी पण आपण ठराव केला होता. ५/१२/२०१७ ला एक ठराव केला होता. सन २०१४-१५ चा वित्तीय वर्षातच लेखा परिक्षण अहवाल स्थायी समितीमध्ये सादर करणेबाबत स्टॅन्डिंगमध्ये काही लेखा जोखा येत नाही. आपण फक्त लेखा परिक्षणाचा स्टाफ वाढवतो. ह्या ठरावाचे काय झाले.

**मा. सभापती :-**

साहेब स्थायी समितीमध्ये सर्व सदस्यांना जो लेखापरिक्षणाचा अहवाल होता. तो देण्यात आला. संपूर्ण ऑडीट करुन ज्या ज्या त्रुटी आहेत काही इनरेग्युलेटरीज आहे. त्याचा अहवाल सर्वांना वाटण्यात आला होता. आणि त्यावेळी त्याचे वाचन करण्यात आले त्यावेळी आम्ही सांगितले की ह्याच्यात ज्या ज्या त्रूटी आहेत किंवा जे अनुपालन करायचे आहे ते सर्व करुन विद इन फोर मन्थ सर्व सदस्यांना अहवाल द्या. साहेब तो अहवाल दिलाच नाही. मग ऑडीटर लोकांना नियुक्त करुन मतलब काय? फक्त तुमच्या लोकांचे काम तुम्ही करणार.

**दिग्वीजय चव्हाण :-**

सभापती महोदय ह्याच्यात मुख्यलेखा परिक्षक ह्यांचाच अहवाल नाही. मा. महालेखाकार, स्थानिक निधी लेखापरिक्षक आणि मुख्य लेखापरिक्षक ह्यांचे जे अहवाल आहेत ते अहवाल त्या ऑडीट यंत्रणेने विभागाला आपल्या मान्यतेने दिले जातात. त्याच्यानंतर त्याचा कॉम्पलायन्स त्या त्या यंत्रणेकडे सादर करणे गरजेचे आहे. समजा लोकल फंड हा लोकल फंडच्या डायरेक्टरकडे एजीकडे आणि मुख्य लेखापरिक्षक आमचे जे अहवाल आहेत ते आमच्याकडे विभागाचा रिस्पॉन्स आम्हाला भेटत नाही. मा. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेतली आहे. निर्देश दिले आहेत पण त्याचे अनुपालन प्राप्त झाले नाही. त्याच्या मधल्या वसूल पात्र रकमा आहेत. त्याच्या संदर्भामध्ये सर आम्ही पत्रव्यवहार केला आहे त्या सर्व रकमा भरा.

**मा. सभापती :-**

ही बाब गंभीर आहे ना.

**दिग्वीजय चव्हाण :-**

निश्चितच पाठपुरावा..................

**मा. सभापती :-**

पाठपूरावा नाही जर अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा अनुपालन आला नाही त्यांनी कॉम्पलायन्सेस केल्या नाहीत तर त्यांची सगळी काम थांबवावी त्याचे पगार थांबवावे.

**सुरेश खंडेलवाल :-**

मा. आयुक्त महोदय हा गंभीर विषय आहे. म्हणजे स्टॅन्डिंग कमिटी ठराव करायचा द्यायचा आमचे काम झाले.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

ह्याबाबत लेखापरिक्षकाने जे सांगितले आहे त्या अनुषंगाने आम्ही तातडीने एक विभाग प्रमुखाची मिटींग लावून त्यांना आदेश देऊ.

**सुरेश खंडेलवाल :-**

ठराव करुन दिला विषय संपला पुढच्या मिटींगला सविस्तर माहिती द्या. कुठल्या कुठल्या डिपार्टमेंटला काय पत्र दिले अहवाल सादर केला ते आम्हाला माहित पडले पाहिजे.

**दिग्वीजय चव्हाण :-**

मा. सभापती महोदय लेखापरिक्षणाच्या संदर्भात माझ्याकडून जो पत्रव्यवहार होईल त्याची कॉपी मी आपल्याला देईन.

**सुरेश खंडेलवाल :-**

साहेब त्याच्यात कारवाई पण आहे ना.

**मा. सभापती :-**

कोणतीही ॲक्शन घेणे महत्वाचे आहे. प्रशासनाने जर ठरवले ना तर सगळ करु शकतो. ह्या दोन्ही ऑडिटरसाठी आम्ही ठराव पास केला होता की नव्याने नियुक्ती करण्यात यावी. विद इन वन मन्थ प्रोसेस कम्पलीट करुन तेच अधिकारी पुन्हा त्या कामावर आले. म्हणजे किती फास्ट तत्परता दाखवली. म्हणजे ॲड काढली पेपरला ॲड दिली. त्याचे अर्ज पण मागवण्यात आले आणि अर्ज मागवून त्यांची इन्टरव्ह्यू घेऊन त्यांची नियुक्ती करण्यात आली. पुन्हा कमिशनरनी शिफारस करुन तो पुन्हा त्यांना ६ महिन्यांची मुदतवाढ

देण्यात आली. आणि स्थायीकडे पुन्हा प्रस्ताव पाठवला. म्हणजे एवढे इफेशियन्ट आणि प्रॉम्प्ट काम तुमची लोक तुमच्यासाठीच करणार असतील मग बाकीची काम पण प्रॉम्प्ट करा ना. १८ दिवसात तुमच्या महापालिकेच्या प्रशासनानी ह्या दोन्ही ऑडीटरना पुन्हा घेण्यात आले.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय माझी एक शंका आहे. पालिकेमध्ये किती निविदा निघाल्या किंवा काय गरजा आहेत किंवा संकेतस्थळावर काय पाठवण्यात येते अशा प्रकारच्या गोष्टी तुमच्यापर्यंत तरी पोहोचतात का?

**मा. सभापती :-**

नाही.

**जुबेर इनामदार :-**

ह्याला कारण काय कारण प्रशासन देत नाही. साहेब आम्ही पालिकेचे विश्वस्त आहोत. संकेतस्थळावर जी माहिती जाते ती आम्हाला व्हाया ई-मेल आली पाहिजे. निविदा प्रक्रियापासून करतच नाही. कितीतरी वर्षापासून बोलतो ह्या विषयीची गोपनियता का? हा पारदर्शक प्रकार का नाही. तुम्ही एक निविदा संकेतस्थळावर टाकल्या की ती आमच्याकडे ऑटोमॅटीक पोहोचली पाहिजे आम्ही पालिकेचे विश्वस्त आहोत.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

आपली संकेतस्थळावरची आणि गर्व्हमेंटची जे महाऑनलाईन ई-टेंडरींग पोर्टल आहे. त्याच्यावरच्या ज्या निविदा आहेत त्या कोणीही कुठेही एम.बी.एम.सी. ची निविदा कूठली आली आहे त्या संकेतस्थळावर आहेत. महाऑनलाईनच्या टेंडरवर सुध्दा आहेत.

**जुबेर इनामदार :-**

महाइनटेंडरींग जी सेवा आहे ना त्याच्यासाठी आम्हाला त्याचा लॉगीन आयडी विकत घ्यायला लागेल. त्याचे कम्पलीट डॉक्युमेन्टेशन चेक करायचे असतील तर त्याचा लॉगीन आयडी ठेकेदार घेतात. सिग्नेचर ऑथोरीटी ते आम्हाला करुन घ्यायला लागेल.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

जर तुम्हाला त्याच्यात पार्टीसिपेट करायचे असेल ज्यांना पार्टीसिपेट करायचे आहे............

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला पार्टीसिपेट करायचे नाही.

**मा. उपायुक्त (मु.) :-**

त्याच्यासाठीच डिजीटल सिग्नेचरची आवश्यकता आहे. ज्यांना नुसते बघायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

ओपन होत नाही. संकेतस्थळावर लिंक करा ना तो विषय. आमच्याकडे संकेतस्थळ लिंक केले पाहिजे. केलेल्या संकेतस्थळावर पाठवलेल्या प्रत्येक विषयाचे आम्हाला ते आमच्या ईमेलवर लिंक झाले पाहिजे. आज फेरिवाला धोरणाची दुपारी २ वाजता बैठक लावली आहे ना कधी धोरण झाले कधी त्या संस्थांची नोंदणी झाली आम्हाला काहीच माहित नाही. रोज तेवढ्या बारकाईने वर्तमानपत्र बघितले जात नाही.

**मा. सभापती :-**

तोच विषय आम्ही महासभेत घेतला होता. ते धोरण आम्ही मंजूर करत नव्हतो.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यामध्ये जो लॉ चा इश्यू आहे. त्यावर आम्ही चर्चा केली.

**मा. सभापती :-**

ठीक आहे. आयुक्त साहेब काय आहे ते बघून घ्या.

**सुरेश खंडेलवाल :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागाकरीता तात्पुरत्या स्वरुपात सेवा निवृत्त अधिकाऱ्यांची सेवा करारपध्दतीने, ठोक मानधनावर श्री . मधुकर सुर्वे, लेखाधिकारी व श्री . प्रभाकर वर्तक, लेखाधिकारी यांची नियुक्ती दि. ३१/०१/२०१८ रोजीच्या आदेशान्वये लेखाधिकारी पदावर तात्पुरत्या स्वरुपात प्रथमत : ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती केली आहे. सदरची मुदत दि. ३०/०७/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे.**

**सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६ शासन निर्णयातील अनुक्रमांक २ (अ) निवडप्रक्रिया व नियुक्तीमध्ये अनुक्रमांक ७ मध्ये करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी एका वेळी जास्तीत जास्त १ वर्षासाठी व आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीचे दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल. मात्र एकूण**

**कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही . सदरचा शासन निर्णयातील अनुक्रमांक ६ प्रमाणे हा शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालय, शासकीय उपक्रम, संविधिक संस्था, मंडळे/महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी लागु राहिल अशी तरतुद आहे.**

**सबब सदर शासन निर्णयानुसार श्री . मधुकर सुर्वे, लेखाधिकारी व श्री. प्रभाकर वर्तक, लेखाधिकारी यांची महानगरपालिकेतील लेखा परिक्षण विभागस आवश्यकता असल्याने लेखाधिकारी यांना दि . ३१/०७/२०१८ रोजी १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि . ०१/०८/२०१८ पासून ते दि. ३१/०७/२०१९ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीसाठी (सेवा करारपध्दतीने) नव्याने नेमणूक करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.**

प्रशांत दळवी :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. ४८ :-

**लेखापरिक्षण विभागासाठी मानधनावर नेमलेल्या श्री . मधुकर सुर्वे, लेखाधिकारी व श्री . प्रभाकर वर्तक, लेखाधिकारी यांच्या नियुक्तीचे नुतनीकरण करणेबाबत.**

ठराव क्र. ४४ :-

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण विभागाकरीता तात्पुरत्या स्वरुपात सेवा निवृत्त अधिकाऱ्यांची सेवा करारपध्दतीने, ठोक मानधनावर श्री . मधुकर सुर्वे, लेखाधिकारी व श्री . प्रभाकर वर्तक, लेखाधिकारी यांची नियुक्ती दि. ३१/०१/२०१८ रोजीच्या आदेशान्वये लेखाधिकारी पदावर तात्पुरत्या स्वरुपात प्रथमत : ०६ महिन्यांच्या कालावधीसाठी नियुक्ती केली आहे. सदरची मुदत दि. ३०/०७/२०१८ रोजी संपुष्टात येत आहे.**

**सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६ शासन निर्णयातील अनुक्रमांक २ (अ) निवडप्रक्रिया व नियुक्तीमध्ये अनुक्रमांक ७ मध्ये करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी एका वेळी जास्तीत जास्त १ वर्षासाठी व आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीचे दरवर्षी नुतनीकरण करण्यात येईल . मात्र एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही . सदरचा शासन निर्णयातील अनुक्रमांक ६ प्रमाणे हा शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालय, शासकीय उपक्रम, संविधिक संस्था, मंडळे/महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी लागु राहिल अशी तरतुद आहे.**

**सबब सदर शासन निर्णयानुसार श्री . मधुकर सुर्वे, लेखाधिकारी व श्री. प्रभाकर वर्तक, लेखाधिकारी यांची महानगरपालिकेतील लेखा परिक्षण विभागस आवश्यकता असल्याने लेखाधिकारी यांना दि . ३१/०७/२०१८ रोजी १ दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि . ०१/०८/२०१८ पासून ते दि. ३१/०७/२०१९ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीसाठी (सेवा करारपध्दतीने) नव्याने नेमणूक करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.**

सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ४९, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णालयात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या बालरोग तज्ञ , वैद्यकीय अधिकारी (MBBS/BAMS) तसेच क्ष -किरण तंत्रज्ञ या पदांवर कार्यरत असलेल्या उमेदवारांचे नव्याने नियुक्ती करणेबाबत.**

रवि व्यास :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णालयाकरीता वैद्यकीय तज्ञ (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ, बालरोग तज्ञ, भिषक) वैद्यकीय अधिकारी **(MBBS/BAMS)** व क्ष-किरण **तं**त्रज्ञ हे रिक्त पदे ठोक मानधनावर थेट मुलाखतीद्वारे **(walk in selection) भरणेत आली** होती. त्याअनुषंगाने एकुण-**10** पद निहाय व प्रवर्ग निहाय उमेदवार कार्यरत असलेल्या वैद्यकीय तज्ञ (बालरोग तज्ञ) वैद्यकीय अधिकारी **(MBBS/BAMS)** व क्ष-किरण तंत्रज्ञ **इ. 10 पदे**

**भरण्यात आली आहेत व त्यांची सेवा संपू ष्टात आल्यानंतर 06 महिन्यांकरीता नव्याने नवीकरण करणे आवश्यक आहे.**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी यांची नावे व शैक्षणिक अर्हता | पदाचे नाव | प्रवर्ग | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|
| **1** | डॉ. उमेश प्रताप सिंग **(MBBS, DCH)** | बालरोग तज्ञ | खुला | **01/03/2018** ते **31/05/2018** |
| **2** | डॉ. **मौर्या सुशिलकुमार मेवालाल (MBBS)** | वैद्यकीय अधिकारी | **खुला** | **01/03/2018** ते **31/05/2018** |
| **3** | डॉ. क्रांती चंद्रशेखर कांबळे **(BAMS)** | वैद्यकीय अधिकारी | अ.जा. | **01/03/2018** ते **31/05/2018** |
| **4** | डॉ. वीणा बापू माने **(BAMS)** | वैद्यकीय अधिकारी | अ.जा. | **01/03/2018** ते **31/05/2018** |
| **5** | श्री. ह्रदेश अशोक सोंडे **(B.P.M.T.)** | **क्ष-किरण तंत्रज्ञ** | खुला | **01/03/2018** ते **31/05/2018** |
| **6** | डॉ. विश्वकर्मा मनोजकुमार पंचदेव **(MBBS)** | वैद्यकीय अधिकारी | खुला | **28/03/2018** ते **27/06/2018** |
| **7** | डॉ. पांडूरंग जनार्दन माने **(BAMS)** | वैद्यकीय अधिकारी | खुला | **28/03/2018** ते **27/06/2018** |
| **8** | डॉ. जाधव निरंजन देवराव **(BAMS)** | वैद्यकीय अधिकारी | वि.जा.अ. | **28/03/2018** ते **27/06/2018** |
| **9** | डॉ. बेटमोगरेकर दत्तात्रय मारोतीराव **(BAMS)** | वैद्यकीय अधिकारी | खुला | **27/04/2018** ते **26/07/2018** |
| **10** | डॉ. शर्मा विष्णुकांत नंदकिशोर **(BAMS)** | वैद्यकीय अधिकारी | खुला | **27/04/2018** ते **26/07/2018** |

वरीलप्रमाणे ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय तज्ञ, वैद्यकीय अधिकारी व क्ष-किरण तंत्रज्ञ यांची नेमणूक भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी रुग्णालय व भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे **कार्यरत आहेत.**

अ.क्र.**1** ते **5** या उमेदवारां**चा** नियुक्ती कालावधी दि.**31/05/2018** रोजी संपूष्टात येत आहे. त्यांना दि.**01/06/2018** रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.**02/06/2018** ते दि.**01/12/2018** पर्यंत **6** महिन्यासाठी तसेच अ.क्र. **6** ते **8** या उमेदवारांची दि.**27/06/2018** रोजी मुदत संपूष्टात येत असल्याने दि.**28/06/2018** रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.**29/06/2018** ते दि.**28/12/2018** पर्यंत **6** महिन्यांसाठी व अ.क्र. **9** व **10** या उमेदवारांना दि.**26/07/2018** पर्यंत मंजूर कार्यकाल शिल्लक असुन दि.**27/07/2018** रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.**30/07/2018** ते दि.**29/01/2019** पर्यंत **6** महिन्यांसाठी **नव्याने नवीकरण करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) नुसार 06 महिन्याकरीता नव्याने नियुक्तीबाबत मा. स्थायी समितीची मंजूरी घेणे अनिवार्य आहे. करीता सदर 10 वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना नव्याने नवीकरण प्रस्तावास ही सभा मंजूरी देत आहे.**

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय स्थायी समितीत डॉक्टर आहेत. साहित्य रिपेयरिंगचा विषय झाला होता. तो विषय फायनल झाला का?

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

मा. सभापतीच्या परवानगीने बोलतो मा. सभापतींनी सुचवल्याप्रमाणे लोकली उपकरणाची दुरुस्ती करणारा जो वेंडर आहे. त्याच्याशी चर्चा होऊन त्यांनी सर्व उपकरणाची पाहणी केलेली आहे. त्याच्याशी आजच बोलण झालं. उपकरण भरपूर असल्यामुळे द्यायला वेळ लागला. उपकरण जी नादुरुस्त होती तो आपल्याकडे आज प्रस्ताव सबमीट करतो तो आल्यावर पाहणी करुन उचित निर्णय घेतला जाईल.

**जुबेर इनामदार :-**

एक्स-रे मशिन ज्या बंद आहेत त्या अजून बंदच आहेत.

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

इंदिरा गांधीची बंद आहे, टेंब्याची चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय दोन महिने झाले.

**अनिल विराणी :-**

मा. सभापती महोदय इंदिरा गांधी हॉस्पीटलमध्ये ॲम्ब्युलन्स एक महिन्यापासून बंद आहे. इमरजन्सी काय घटना घडली तर आपण काय करणार मी पानपट्टे साहेबांना पण विचारले. नंतर तो चार्ज खेत्रे साहेबांनी घेतला. तेथे पर्यायी व्यवस्था करुन द्या.

**दिप्ती भट :-**

मा. सभापती महोदय एक्स-रे मशिन ३-४ महिन्यापासून बंद आहे तो माणूस तिथेच खाली उभा राहतो. त्याला काही काम नाही. त्याला सॅलरी देतो तो दुसरे काम करु शकत नाही का?

**डॉ. प्रमोद पडवळ :-**

त्याला आपण इंदिरा गांधीला पाठवले आहे. इकडे लोड पण जास्त आहे.

**दिप्ती भट :-**

ज्यांचे मशिन बिघडले आहेत ते असेच उभे आहेत. ते हॉस्पीटलमध्ये दुसरी काम करु शकत नाही का? उत्तर व्यवस्थित देत नाही आणि औषध मागायला गेले की इथे नाही टेंबा में जावो............

**मा. सभापती :-**

ते काम एकदम फास्ट करुन घ्या. खेत्रे साहेब तुमच्याकडे वाहन विभाग आहे ना. सर्व शववाहिनी आणि ॲम्ब्युलन्स रिपेयर करा. गाडे नावाचा जो गृहस्थ आहे ना तो तिथे काय काम करतो. त्यावर लक्ष ठेवा. तो ड्रायव्हर आहे पण तो काम बरोबर करत नाही. त्याला कामाला लावा. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ४९ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णालयात ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या बालरोग तज्ञ , वैद्यकीय अधिकारी (MBBS/BAMS) तसेच क्ष-किरण तंत्रज्ञ या पदांवर कार्यरत असलेल्या उमेदवारांचे नव्याने नियुक्ती करणेबाबत.**

**ठराव क्र. ४५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णालयाकरीता वैद्यकीय तज्ञ (स्त्री रोग व प्रसुती तज्ञ, बालरोग तज्ञ, भिषक) वैद्यकीय अधिकारी **(MBBS/BAMS)** व क्ष-किरण **तं**त्रज्ञ हे रिक्त पदे ठोक मानधनावर थेट मुलाखतीद्वारे **(walk in selection) भरणेत आली** होती. त्याअनुषंगाने एकुण-**10** पद निहाय व प्रवर्ग निहाय उमेदवार कार्यरत असलेल्या वैद्यकीय तज्ञ (बालरोग तज्ञ) वैद्यकीय अधिकारी **(MBBS/BAMS)** व क्ष-किरण तंत्रज्ञ **इ. 10 पदे भरण्यात आली आहेत व त्यांची सेवा संपूष्टात आल्यानंतर 06 महिन्यांकरीता नव्याने नवीकरण करणे आवश्यक आहे.**

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी यांची नावे व शैक्षणिक अर्हता | पदाचे नाव | प्रवर्ग | नियुक्ती कालावधी |
|---|---|---|---|---|
| **1** | डॉ. उमेश प्रताप सिंग **(MBBS, DCH)** | बालरोग तज्ञ | खुला | **01/03/2018** ते **31/05/2018** |
| **2** | डॉ. **मौर्या सुशिलकुमार मेवालाल (MBBS)** | वैद्यकीय अधिकारी | **खुला** | **01/03/2018** ते **31/05/2018** |
| **3** | डॉ. क्रांती चंद्रशेखर कांबळे **(BAMS)** | वैद्यकीय अधिकारी | अ.जा. | **01/03/2018** ते |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | 31/05/2018 |
| 4 | डॉ. वीणा बापू माने (BAMS) | वैद्यकीय अधिकारी | अ.जा. | 01/03/2018 ते 31/05/2018 |
| 5 | श्री. हृदेश अशोक सोंडे (B.P.M.T.) | **क्ष-किरण तंत्रज्ञ** | खुला | 01/03/2018 ते 31/05/2018 |
| 6 | डॉ. विश्वकर्मा मनोजकुमार पंचदेव (MBBS) | वैद्यकीय अधिकारी | खुला | 28/03/2018 ते 27/06/2018 |
| 7 | डॉ. पांडूरंग जनार्दन माने (BAMS) | वैद्यकीय अधिकारी | खुला | 28/03/2018 ते 27/06/2018 |
| 8 | डॉ. जाधव निरंजन देवराव (BAMS) | वैद्यकीय अधिकारी | वि.जा.अ. | 28/03/2018 ते 27/06/2018 |
| 9 | डॉ. बेटमोगरेकर दत्तात्रय मारोतीराव (BAMS) | वैद्यकीय अधिकारी | खुला | 27/04/2018 ते 26/07/2018 |
| 10 | डॉ. शर्मा विष्णुकांत नंदकिशोर (BAMS) | वैद्यकीय अधिकारी | खुला | 27/04/2018 ते 26/07/2018 |

वरीलप्रमाणे ठोक मानधनावर कार्यरत असलेल्या वैद्यकीय तज्ञ, वैद्यकीय अधिकारी व क्ष-किरण तंत्रज्ञ यांची नेमणूक भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी रुग्णालय व भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय येथे **कार्यरत आहेत.** अ.क्र.1 ते 5 या उमेदवारांचा नियुक्ती कालावधी दि.31/05/2018 रोजी संपूष्टात येत आहे. त्यांना दि.01/06/2018 रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.02/06/2018 ते दि.01/12/2018 पर्यंत 6 महिन्यासाठी तसेच अ.क्र. 6 ते 8 या उमेदवारांची दि.27/06/2018 रोजी मुदत संपूष्टात येत असल्याने दि.28/06/2018 रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.29/06/2018 ते दि.28/12/2018 पर्यंत 6 महिन्यांसाठी व अ.क्र. 9 व 10 या उमेदवारांना दि.26/07/2018 पर्यंत मंजूर कार्यकाल शिल्लक असुन दि.27/07/2018 रोजी एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि.30/07/2018 ते दि.29/01/2019 पर्यंत 6 महिन्यांसाठी **नव्याने नवीकरण करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 53 (3) नुसार 06 महिन्याकरीता नव्याने नियुक्तीबाबत मा . स्थायी समितीची मंजूरी घेणे अनिवार्य आहे. करीता सदर 10 वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांना नव्याने नवीकरण प्रस्तावास ही सभा मंजूरी देत आहे.**

सुचक :- श्री. रवि व्यास          अनुमोदन :- श्री. अनिल विराणी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५०, **मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेणे कामी नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**मोहन म्हात्रे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालकीची एकुण ६६ वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा. सामान्य प्रशासन, आरोग्य विभाग, वैदयकिय आरोग्य विभाग, अग्नीशमन विभाग, उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग, मालमत्ता कर विभाग, पाणीपुरवठा विभाग इ. विभागांमध्ये कार्यरत आहेत. सदरची वाहने अपुरी पडत असल्याने महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहने वाहनचालकसह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाडयाने घेणेकामी वार्षिक निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेची मुदत दि. २८/०६/२०१८ रोजी संपूष्टात येत आहे. सदरची मुदत संपण्यापूर्वी नविन निविदा मागविणे आवश्यक आहे.

सन २०१७-१८ या कालावधीत वाहने वाहनचालकसह इंधनासह संपूर्ण सेवा भाडयाने पुरवठा करणेकामी मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांना जा.क्र.मनपा/वाहन/७४/२०१७-१८ दि. २९/०६/२०१७ अन्वये वार्षिक कार्यादेश देण्यात आला होता. सदर कार्यादेशाची मुदत दि. २८/०६/२०१८ रोजी संपत आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात "खाजगी गाडया भाडयाने घेणे" या लेखाशिर्षाअंतर्गत १.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर तरतुदीतून महापालिकेच्या विविध विभागात ठेक्याने वाहने पुरवठा करणेकामी चालू ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात नविन निविदा मागवून ठेकेदार नेमणे आवश्यक आहे. अन्यथा ठेका संपूष्टात आल्यानंतर वाहने बंद झाल्यास महापालिकेच्या विविध विभागातील कार्यालयीन कामकाजावर व वसूलीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी महापालिकेच्या विविध विभागात सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता ठेका पध्दतीने वाहने वाहनचालकासह इंधनासह संपूर्ण सेवा भाडयाने घेणे कामी निविदा मागविणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**अनिल विराणी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५० :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेणे कामी नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ४६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मालकीची एकुण ६६ वाहने असुन सदर वाहने आवश्यकतेनुसार विविध विभागात उदा. सामान्य प्रशासन, आरोग्य विभाग, वैदयकिय आरोग्य विभाग, अग्नीशमन विभाग, उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग, मालमत्ता कर विभाग, पाणीपुरवठा विभाग इ. विभागांमध्ये कार्यरत आहेत. सदरची वाहने अपुरी पडत असल्याने महानगरपालिकेच्या विविध विभागात ठेका पध्दतीने वाहने वाहनचालकसह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाडयाने घेणेकामी वार्षिक निविदा मागविण्यात आली होती. सदर निविदेची मुदत दि. २८/०६/२०१८ रोजी संपूष्टात येत आहे. सदरची मुदत संपण्यापूर्वी नविन निविदा मागविणे आवश्यक आहे.

सन २०१७-१८ या कालावधीत वाहने वाहनचालकसह इंधनासह संपूर्ण सेवा भाडयाने पुरवठा करणेकामी मे. सिताराम ट्रॅव्हल्स यांना जा.क्र.मनपा/वाहन/७४/२०१७-१८ दि. २९/०६/२०१७ अन्वये वार्षिक कार्यादेश देण्यात आला होता. सदर कार्यादेशाची मुदत दि. २८/०६/२०१८ रोजी संपत आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात "खाजगी गाडया भाडयाने घेणे" या लेखाशिर्षाअंतर्गत १.०० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

सदर तरतुदीतून महापालिकेच्या विविध विभागात ठेक्याने वाहने पुरवठा करणेकामी चालू ठेक्याची मुदत संपण्यापूर्वी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात नविन निविदा मागवून ठेकेदार नेमणे आवश्यक आहे. अन्यथा ठेका संपूष्टात आल्यानंतर वाहने बंद झाल्यास महापालिकेच्या विविध विभागातील कार्यालयीन कामकाजावर व वसूलीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी महापालिकेच्या विविध विभागात सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता ठेका पध्दतीने वाहने वाहनचालकासह इंधनासह संपूर्ण सेवा भाडयाने घेणे कामी निविदा मागविणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५१, **श्री. दादासाहेब खेत्रे, विभाग प्रमुख, अतिक्रमण विभाग यांच्या अपिलीय अर्जावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.** प्रकरण क्र. ५२, **श्री. सचिन पवार, कनिष्ठ अभियंता यांच्या अपिलीय अर्जावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**जुबेर इनामदार :-**

असे दोन विषय आहेत. प्रशासकीय विषय आहेत ह्या विषयाची माहिती आम्हाला सकाळी सभागृहात आल्यावर मिळाली तर आम्हाला ह्याचा अभ्यास करायला वेळ आणि संधी मिळाली पाहिजे. सखोल अभ्यास झाल्यावर हा विषय पुढच्या सभेमध्ये घ्या.

**दिप्ती भट :-**

मला पण तेच सांगायचे आहे की आताच पेपर दिले काही माहिती नाही.

**प्रशांत दळवी :-**

प्रकरण आताचे नाही.

**दिप्ती भट :-**

पण हे काय आहे तेच माहिती नाही.

**प्रशांत दळवी :-**

गोषवाऱ्यामध्ये पण नमूद केले आहे.

**हसमुख गेहलोत :-**

मा. सभापती महोदय माझा पण ह्या विषयावर अभ्यास बाकी आहे. तर हा विषय पूढच्या सभेत घ्या.

**मा. सभापती :-**

ठीक आहे. प्रकरण क्र. ५१,५२ पूढच्या सभेत घ्यावे.

**(मा. सभापतींच्या आदेशाने सदरचे विषय पुढील सभेत घेण्याचे ठरले.)**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५३, **सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता डास नाशके , अळी नाशके खरेदी करणे कामाची निविदा मागविणेबाबत.**

**सुरेश खंडेलवाल :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे अंदाजित ७९ चौ.किमी इतके विस्तृत आहे. महानगरपालिका क्षेत्राच्या तिन्ही बाजूने खाडी / समुद्र परिसर आहे. शहरातील नागरी, औद्योगिक वसाहतीतुन सांडपाण्याचा निचरा कच्चे, पक्के नाले व गटारातून खाडी / समुद्रात होत असतो. खाडी/समुद्रात सांडपाण्याचा निचरा होत असलेल्या ठिकाणी खाडीच्या पात्रात मोठयाप्रमाणात कांदळवणे आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संथगतीने होत असतो. शहरातील मोकळया जागेत (ओपन प्लॉट) पावसाळया दरम्यान मोठयाप्रमाणात पावसाचे पाणी जामा होऊन डबकी निर्माण होत असतात. त्याचप्रमाणे एकात्मिक नाले बांधणी अंतर्गत शहरामधील कच्चे नाले पक्क्या नाल्याच्या स्वरुपात बांधणेकामी बांधकामे, भुयारी गटार योजना बांधकामे इत्यादी सुरु असल्याने, ठिक ठिकाणी गटारे / नाल्यातील सांडपाण्याचा प्रवाह अडवून कामे पुर्ण करण्यात येत असतात.

एकंदर शहराची भौगोलिक रचना पाहता तसेच शहरातील वरील सर्व परिस्थितीमुळे मोठयाप्रमाणावर डासांची उत्पत्ती होवून डासांचा प्रादुर्भाव होत असतो. सदरचा डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणे कामी शहरात डासनाशकाची व अळीनाशकांची मोठयाप्रमाणावर फवारणी करणे आवश्यक असुन दरवर्षी प्रमाणे विविध नामंकित कंपनीची डास नाशके व इतर डास नाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे डासनाशके, अळी नाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | डास नाशके, अळी नाशकाचे नाव | वार्षिक अंदाजित परिमाण |
|---|---|---|
| १. | Alphacypermtrin 10% AC | २००० लिटर |
| २. | Bacillus thurginsis var Israelensis 5% WP (TAC Approved) | १००० किलो |
| ३. | Bifenthrin 10% WP ISI mark | २०० किलो |
| ४. | Cyfluthrin 5%EW | २००० लिटर |
| ५. | Deltamethrin 2.5% SC | २००० लिटर |

| | | |
|---|---|---|
| ६. | Dichlorovos 76% EC | ५०० लिटर |
| ७. | Diflubenzeron 2% Tablet | २०० किलो |
| ८. | Diflubenzeron 25%WP | २०० किलो |
| ९. | Diflubenzuron 20% SC + Deltamethrin 2% | ५०० लिटर |
| १०. | Harbal Sanitizer | २००० लिटर |
| ११. | Jet Spray Machine | ५ |
| १२. | Lambda Cyhalothrin 9.7% CS | ५०० लिटर |
| १३. | M.L.O. Oil | १०००० लिटर |
| १४. | Malathion 50% EC | ५०० लिटर |
| १५. | Novaluron 10% EC | २०० लिटर |
| १६. | Polydimethylsioxane (PDMS) 70% | २०० लिटर |
| १७. | Propoxure 2% Bait | १०० किलो |
| १८. | Propoxure 20% E.C (ISI Mark) | ५०० लिटर |
| १९. | Pyrethrum 2% E.C (ISI Mark) | १००० लिटर |
| २०. | Pyrethrum 2% Ettract (ISI Mark) | १००० लिटर |
| २१. | Pyrosene Oil E ISI mark | ५००० लिटर |
| २२. | Temephos 50% EC ISI mark | ३००० लिटर |
| २३. | Spray Pump (Bronze – 12 Liter ) | १०० नग |

महानगरपालिका क्षेत्रात फवारणी करणेकरीता वरीलप्रमाणे डास नाशके, अळी नाशके खरेदी करणे कामी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात "एकात्मिक डास निर्मुलन योजना" या लेखाशिर्षाखाली रु. ३,००,००,०००/- तरतुद शिल्लक आहे. उपरोक्त प्रमाणे वार्षिक निविदा मागविणेस अंदाजित रु. २,००,००,०००/- खर्च अपेक्षित असल्याने इ-टेंडरद्वारे निविदा मागवून खरेदी करणे कामास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय २००० लिटर हर्बल सॅनिटायझर मागवले आहे. स्थायी समितीच्या वॉश रुममध्ये साधा साबण सुध्दा नाही.

**मा. सभापती :-**

त्यांनी सॅक्शन करुन घेतले आहे. आवश्यकतेनुसार ते मागवतील. ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

माझा सॅनिटायझरला विरोध नाही. आपल्या परिस्थितीवर आहे.

**दिप्ती भट :-**

प्रभाग समितीचे टॉयलेट एवढे खराब आहेत की लोक दुसऱ्या केबीनमध्ये टॅक्स भरायला जाऊ शकत नाही. पाय पुसायला फडके नाहीत. बाथरुम सुध्दा घाण आहेत. सगळ्या प्रभागाची बाथरुम बघा.

**जुबेर इनामदार :-**

मॅथलीन बॉल्स वगैरे असायला पाहिजेत. प्रभाग कार्यालयात स्वतः जा आणि उभे रहा.

**दिप्ती भट :-**

तिकडून चालू शकत नाही.

**मा. सभापती :-**

शनिवारी मध्ये सर्व प्रभाग समितीमध्ये जायचे व्हिजीट करायची आणि जे जे टॉयलेट आहेत त्याच्यावर ॲक्शन घ्यायची.

**दिप्ती भट :-**

पूनम सागरचे हॉस्पीटल आहे तिकडे गोणपाट ठेवले आहे.

**मा. सभापती :-**

शिंदे साहेब हॉस्पीटल प्रभाग समिती लिहून घ्या. तुम्ही एक काम करा. प्रभाग समिती ते बघतील हॉस्पीटल तुम्ही बघा. पूढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५३ :-**

**सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता डास नाशके , अळी नाशके खरेदी करणे कामाची निविदा मागविणेबाबत.**

**ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्र हे अंदाजित ७९ चौ.किमी इतके विस्तृत आहे. महानगरपालिका क्षेत्राच्या तिन्ही बाजूने खाडी / समुद्र परिसर आहे. शहरातील नागरी, औद्योगिक वसाहतीतुन सांडपाण्याचा निचरा कच्चे, पक्के नाले व गटारातून खाडी / समुद्रात होत असतो. खाडी/समुद्रात सांडपाण्याचा निचरा होत असलेल्या ठिकाणी खाडीच्या पात्रात मोठयाप्रमाणात कांदळवणे आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संथगतीने होत असतो. शहरातील मोकळया जागेत (ओपन प्लॉट) पावसाळया दरम्यान मोठयाप्रमाणात पावसाचे पाणी जामा होऊन डबकी निर्माण होत असतात. त्याचप्रमाणे एकात्मिक नाले बांधणी अंतर्गत शहरामधील कच्चे नाले पक्क्या नाल्याच्या स्वरुपात बांधणेकामी बांधकामे, भुयारी गटार योजना बांधकामे इत्यादी सुरु असल्याने, ठिक ठिकाणी गटारे / नाल्यातील सांडपाण्याचा प्रवाह अडवून कामे पुर्ण करण्यात येत असतात.

एकंदर शहराची भौगोलिक रचना पाहता तसेच शहरातील वरील सर्व परिस्थितीमुळे मोठयाप्रमाणावर डासांची उत्पत्ती होवून डासांचा प्रादुर्भाव होत असतो. सदरचा डासांचा प्रादुर्भाव रोखणे व नियंत्रण करणे कामी शहरात डासनाशकाची व अळीनाशकांची मोठयाप्रमाणावर फवारणी करणे आवश्यक असुन दरवर्षी प्रमाणे विविध नामंकित कंपनीची डास नाशके व इतर डास नाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे डासनाशके, अळी नाशके खरेदी करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | डास नाशके, अळी नाशकाचे नाव | वार्षिक अंदाजित परिमाण |
|---|---|---|
| १. | Alphacypermtrin 10% AC | २००० लिटर |
| २. | Bacillus thurginsis var Israelensis 5% WP (TAC Approved) | १००० किलो |
| ३. | Bifenthrin 10% WP ISI mark | २०० किलो |
| ४. | Cyfluthrin 5%EW | २००० लिटर |
| ५. | Deltamethrin 2.5% SC | २००० लिटर |
| ६. | Dichlorovos 76% EC | ५०० लिटर |
| ७. | Diflubenzeron 2% Tablet | २०० किलो |
| ८. | Diflubenzeron 25%WP | २०० किलो |
| ९. | Diflubenzuron 20% SC + Deltamethrin 2% | ५०० लिटर |
| १०. | Harbal Sanitizer | २००० लिटर |
| ११. | Jet Spray Machine | ५ |
| १२. | Lambda Cyhalothrin 9.7% CS | ५०० लिटर |
| १३. | M.L.O. Oil | १०००० लिटर |
| १४. | Malathion 50% EC | ५०० लिटर |
| १५. | Novaluron 10% EC | २०० लिटर |
| १६. | Polydimethylsioxane (PDMS) 70% | २०० लिटर |
| १७. | Propoxure 2% Bait | १०० किलो |
| १८. | Propoxure 20% E.C (ISI Mark) | ५०० लिटर |
| १९. | Pyrethrum 2% E.C (ISI Mark) | १००० लिटर |
| २०. | Pyrethrum 2% Ettract (ISI Mark) | १००० लिटर |
| २१. | Pyrosene Oil E ISI mark | ५००० लिटर |
| २२. | Temephos 50% EC ISI mark | ३००० लिटर |
| २३. | Spray Pump (Bronze – 12 Liter ) | १०० नग |

महानगरपालिका क्षेत्रात फवारणी करणेकरीता वरीलप्रमाणे डास नाशके, अळी नाशके खरेदी करणे कामी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात "एकात्मिक डास निर्मुलन योजना" या लेखाशिर्षाखाली रु. ३,००,००,०००/- तरतुद शिल्लक आहे. उपरोक्त प्रमाणे वार्षिक निविदा मागविणेस अंदाजित रु. २,००,००,०००/- खर्च अपेक्षित असल्याने इ-टेंडरद्वारे निविदा मागवून खरेदी करणे कामास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५४, **मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वृक्षारोपणाकरीता पामची रोपे पुरवठा करणेबाबत.**

**रवि व्यास :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या सन २०१८ मधील शासन निर्णय महसुल व वन विभाग यांचे दि. १० ऑक्टोबर २०१६ व महसुल व वन विभाग यांचे साववि-२०१७ प्र.क्र.१३८/फ-११ दि. २८-९-२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार १३ कोटी वृक्षरोपण कार्यक्रमाच्या अनुषंगाने वृक्षरोपण करणेबाबत निर्देश दिले आहे. फाउंटन हॉटेल ते दहिसर चेकनाका, जेसल पार्क चौपटी भाईंदर (पूर्व) व नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान भाईंदर (प.) येथे व इतर रस्त्यांवर पामची रोपे लावणे आहे. सद्यस्थितीत पावसाचे दिवस लक्षात घेता तातडीने पामची रोपे उपलब्ध होण्याकरीता मा. आयुक्त यांनी दर मागवुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची "ड" प्रकरण ५ (२) (२) नुसार आर्थिक व प्रशासकी मान्यता देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

पाम ट्री दिली ना.

**मा. सभापती :-**

आपण काय केले माहित आहे का हे जे रेट आले आहेत ह्या रेटला आपण मंजूरी दिली नाही. आयुक्तांनी दर मागवून करायचे आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय पाम ट्री ड्राय एरियामध्ये लावतात. ह्याला सावली नाही. ह्याला फळ येत नाही आणि ह्याच्यावर पक्षी सुध्दा बसत नाही. प्लान्टेशन हा शहराच्या महत्वाचा भाग आहे. त्याला ५० लाख नाही एक कोटी खर्च करा. पण त्याची झाड निवडा. पाम ट्री दिसायला सुंदर दिसतात पण डिव्हायडरमध्ये लावली की डिव्हायडर फाडतात. रस्त्याच्या कडेला लावायची तर रेन ट्री आहेत. त्यावर पक्षी येतात. निमची झाड आहेत ती औषधी आहेत ती लावायला पाहिजेत.

**मा. सभापती :-**

आपल्याकडे सर्व प्रकारची झाडाची रोप आहेत. पाम ट्री ची नाहीत. जेवढे मोठे रस्ते आहेत दोन्ही साईडने पाम ट्री लावली तर सुशोभिकरण चांगल दिसेल. रस्त्याच्या कडेला झाडाच्या फांद्यांची छाटणी करायला लागते. कधी कधी ते त्रासदायक पण होते. आपण सगळे रस्ते निवडले नाही काही ठरावित रस्त्यांमध्ये पाम ट्री लावायची ठराविक रस्त्यांमध्ये इतर झाडाची रोपे लावायची.

**जुबेर इनामदार :-**

साहेब पाम ट्री ची फांडी जर गाडीवर पडली तर गाडीचा टॉप तूटून जातो. एव्हर शाईन मिरारोडमध्ये आजही २५ पामची झाड आहेत. पूर्ण तयार आहेत ते लोक फुकट द्यायला तयार आहेत. ते रिप्लान्टेशनसाठी पण कोण घ्यायला तयार नाहीत.

**मा. सभापती :-**

आपण १५०० मागितले नाही. आपण कमी सांगितले आहे.

**जुबेर इनामदार :-**

वृक्ष प्राधिकरणला एक सुचना आहे की फक्त पामची झाड वगैरे हा जो प्रकार आहे. १-२ झाड लावायची असतील तर ठीक आहे पण ह्याचा काही फायदा होत नाही. त्याऐवजी रेन ट्री लावा. अशोका लावले तर त्याच्या बियाला पक्षी येतात. तुम्हाला सरळ जाणारी झाडच पाहिजेत ना.

**दिपक खांबित :-**

ते चांगले दिसणार.

**जुबेर इनामदार :-**

मान्य आहे पण त्याला सावली नाही. दिसायला चांगले दिसतात.

**मा. सभापती :-**

आपण १-२ रोड करुया आणि ह्याच्या सुचना विचारात घ्या. एका रस्त्यावर ते पण लावा. अख्खा रस्ता तसा सलग येणार नाही. ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**तारा घरत :-**

झाडाची छाटणी बरोबर करत नाही. लहान असतानाच वरच कापून टाकतात. त्यामुळे ते खालीच पसरणार.

**मा. सभापती :-**

इरकर साहेब झाडांची कटींग करतात त्यांना ट्रेनींग द्या.

**प्रकरण क्र. ५४ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात वृक्षारोपणाकरीता पामची रोपे पुरवठा करणेबाबत.**

**ठराव क्र. ४८ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या सन २०१८ मधील शासन निर्णय महसुल व वन विभाग यांचे दि. १० ऑक्टोबर २०१६ व महसुल व वन विभाग यांचे साववि-२०१७ प्र.क्र.१३८/फ-११ दि. २८-९-२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार १३ कोटी वृक्षरोपण कार्यक्रमाच्या अनुषंगाने वृक्षरोपण करणेबाबत निर्देश दिले आहे. फाउंटन हॉटेल ते दहिसर चेकनाका, जेसल पार्क चौपटी भाईंदर (पूर्व) व नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान भाईंदर (प.) येथे व इतर रस्त्यांवर पामची रोपे लावणे आहे. सद्यस्थितीत पावसाचे दिवस लक्षात घेता तातडीने पामची रोपे उपलब्ध होण्याकरीता मा. आयुक्त यांनी दर मागवुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची ‘‘ड’’ प्रकरण ५ (२) (२) नुसार आर्थिक व प्रशासकी मान्यता देण्यात येत आहे असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रवि व्यास        अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५५, **महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरच्या प्रति फेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**प्रशांत दळवी :-**

महानगरपालिकेद्वारे मनपा हद्दीतील नागरीकांना आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे मनपाचे धोरण आहे. सदर टँकर पाणी पुरवठा हा जलवाहिनी नसलेल्या इमारतींना तसेच जलवाहिन्यांच्या अंतिम टप्प्यातील कमी दाबाने पाणी पुरवठा होणाऱ्या इमारतींना व खाजगी कार्यक्रमांना मागणी केल्यास मनपामार्फत रु.८५०/- प्रति फेरा इतके दर आकारुन पुरविण्यात येतात. या व्यतिरिक्त आदिवासी पाडे, धार्मिक कार्यक्रम व दुषित पाणी पुरवठा होणाऱ्या इमारती, तसेच मनपाचे कार्यालये यांना मोफत पाणी पुरवठा करणे महानगरपालिकेचे दायित्व आहे. सदर योजना **ना नफा ना तोटा** या तत्वावर राबविली जाते. उपरोक्त टँकर मनपा भाडे तत्वावर घेऊन पाणी पुरवठा केला जातो.

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरच्या प्रति फेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे कामाची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरच्या प्रति फेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे. **(निविदा-बी २)**

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **१) मे. श्रृती इंटप्रायजेस** | **रु.८२८/- प्रति फेरा**<br>**वाटाघाटीनंतर रु. ७९९/- प्रति फेरा** |
| २) मे. श्री गणेश इंटप्रायजेस | **रु.९६०/- प्रति फेरा** |
| ३) मे. एम.एस. इंटप्रायजेस | **रु.१०५०/- प्रति फेरा** |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता उपरोक्त कामाकरीता **मे. श्रृती इंटप्रायजेस** यांचे प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेस, तसेच सद्यस्थितीत महानगरपालिका ठेकेदारास पाणी वाहातुकीचे भाडे रू.६६६/- प्रति फेरा इतका देण्यात येत असून व नागरीकांस टँकरचा प्रति फेरा दर हा रू.८५०/- (अक्षरी रू. आठशे पन्नास मात्र) इतका आकारण्यात येत आहे. तरी प्राप्त प्रति फेराटँकर वाहतुक दर रू.७९९/- व पाण्याचे दर विचारात घेता नागरीकांकडून प्रति फेरा टँकर रू.१,०००/- (अक्षरी रू. एक हजार मात्र) आकारणे आवश्यक आहे. सदर दरास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे. तसेच सदर निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत टँकर पुरवठा करणे कामी जुन्या निविदेतील दरानुसार होणाऱ्या वाढीव खर्चास ही सभामंजूरी देत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय मी दोन विषय मागे जातो. मिरा भाईंदर वाहन चालकांसंदर्भात परत हा विषय १ कोटी रुपयाचा आहे. आर्थिक प्रशासकीय मंजुरी आम्ही देऊ शकतो का? ५० लाखाच्यावर आपल्याला अधिकार नाही. करता येईल का? तुमचे असे मत आहे की महासभेमध्ये आम्ही दोन कोटी रुपयाचा ठराव केला त्या विषयाला प्रशासकीय मंजुरी आहे का? ऑडिटरनी सांगावे. प्रशासन गोषवारा देतो. प्रशासनाला हात वर करायला दोन मिनिट लागतात. आज ३०-३० वर्षानंतर लोक जेलमध्ये जातात. स्थायी समिती वैधानिक समिती कायदे मोडू नका. ऑडीटरनी उत्तर द्यावे करता येईल तर आपण सोडून देऊ. ऑडिटरनी सांगावे ठिक आहे नाही तर ह्या विषयावर आमचा विरोध नोंदवा.

**मा. सभापती :-**

मागे आपण महासभेमध्ये ठराव केला होता आणि आर्थिक प्रशासकीय मंजूरी देण्याचा अधिकार दिला होता. त्याप्रमाणे आजतागायत ती सिस्टम चालू आहे. आज सुध्दा आयुक्तांनी गोषवारा सही करुन दिला आहे.

**जुबेर इनामदार :-**

आपण ठराव केला त्याला प्रशासनाने मंजूरी दिली आहे का? प्रशासकीय मंजूरी त्या विषयाला आहे का?

**मा. सभापती :-**

त्याच्यानंतर आपल्याकडे आले ना.

**जुबेर इनामदार :-**

दोन ओळी बोला ऑन द हाऊस विषय संपून जाईल. रेकॉर्डमध्ये राहील. सभागृहामध्ये असलेल्या ठरावाला महत्व नाही मिनिट्सला महत्व आहे. तुमच्या ह्या ठरावाला सही करुन दिली ह्याला महत्व नाही. महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियमामध्ये ठराव सही करुन द्या असा कुठेच उल्लेख नाही. ठराव वाचा. सभागृहामध्ये झालेल्या इतिवृत्तांताला महत्व आहे. त्याच्यामध्ये तेवढच मत आहे. लेखापरिक्षकाने आम्हाला सांगावे विषय संपून जातो.

**मा. सभापती :-**

आज प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे. आयुक्तांनी सही केलेली आहे. असे पण नाही की कोणी उपायुक्तांनी किंवा विभाग प्रमुखांनी सही केली आहे. प्रशासनाने आपल्याला गोषवारा देऊन आयुक्तांची सही केली आहे आणि ही लेटेस्ट डेट आहे. असे पण नाही की खूप जुनी डेट आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने त्या वर्षाच्या तांत्रिक बाबींची चाचपणी करावी. लेखापरिक्षकालाही मी तशी सुचना करेन त्याने ह्याची तपासणी करावी करता येईल तर करावे. नाही करता येणार तर ह्या विषयावर आमचा विरोध नोंदवावा.

**मा. सभापती :-**

जुबेरजी ज्यावेळेला आपल्याकडे विषय येतो ना त्यावेळी सदरच्या विषयाची टिप्पणी क्लार्क पासून तर आयुक्तांपर्यंत मंजूर होते. मंजूर झाल्यावरच गोषवारा बनतो त्यानंतर तो गोषवारा आपल्याकडे येतो. ते कायद्याच्या चौकटीत बसल्यानंतरच हे होते. पूढचा विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याकडे एक कोटीची तरतूद आहे. म्हणून आपण एक कोटीची तरतूद आहे असे दिले आहे. तुम्ही किती आर्थिक प्रशासकीय मंजूरी द्या ५० लाख, ४५ लाख किंवा ५५ हजाराची द्या असा कुठे उल्लेख नाही. म्हणून माझे मत आहे. प्रशासनाने आपले हात वर केलेले आहेत. प्रशासन स्वतःच्या जिवावर काही घेत नाही. ह्या गोषवाऱ्यामध्ये वाचून बघा.

**प्रकरण क्र. ५५ :-**

**महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरच्या प्रति फेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**ठराव क्र. ४९ :-**

महानगरपालिकेद्वारे मनपा हद्दीतील नागरीकांना आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे मनपाचे धोरण आहे. सदर टँकर पाणी पुरवठा हा जलवाहिनी नसलेल्या इमारतींना तसेच जलवाहिन्यांच्या अंतिम टप्प्यातील कमी दाबाने पाणी पुरवठा होणाऱ्या इमारतींना व खाजगी कार्यक्रमांना मागणी केल्यास मनपामार्फत रु.८५०/- प्रति फेरा इतके दर आकारुन पुरविण्यात येतात. या व्यतिरिक्त आदिवासी पाडे, धार्मिक कार्यक्रम व दुषित पाणी पुरवठा होणाऱ्या इमारती, तसेच मनपाचे कार्यालये यांना मोफत पाणी पुरवठा करणे महानगरपालिकेचे दायित्व आहे. सदर योजना **ना नफा ना तोटा** या तत्वावर राबविली जाते. उपरोक्त टँकर मनपा भाडे तत्वावर घेऊन पाणी पुरवठा केला जातो.

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरच्या प्रति फेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे कामाची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

२) महानगरपालिकेद्वारे पाणी पुरवठा करणाऱ्या खाजगी टँकरच्या प्रति फेरा दर निश्चित करुन पाणी पुरवठा करणे. (**निविदा-बी २**)

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **१) मे. श्रृती इंटप्रायजेस** | **रु.८२८/- प्रति फेरा**<br>**वाटाघाटीनंतर रु. ७९९/- प्रति फेरा** |
| २) मे. श्री गणेश इंटप्रायजेस | **रु.९६०/- प्रति फेरा** |
| ३) मे. एम.एस. इंटप्रायजेस | **रु.१०५०/- प्रति फेरा** |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता उपरोक्त कामाकरीता **मे. श्रृती इंटप्रायजेस** यांचे प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर निविदांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मान्यता मिळणेस, तसेच सद्यस्थितीत महानगरपालिका ठेकेदारास पाणी वाहातुकीचे भाडे रू.६६६/- प्रति फेरा इतका देण्यात येत असून व नागरीकांस टँकरचा प्रति फेरा दर हा रू.८५०/- (अक्षरी रू. आठशे पन्नास मात्र) इतका आकारण्यात येत आहे. तरी प्राप्त प्रति फेराटँकर वाहतुक दर रू.७९९/- व पाण्याचे दर विचारात घेता नागरीकांकडून प्रति फेरा टँकर रू.१,०००/- (अक्षरी रू. एक हजार मात्र) आकारणे

आवश्यक आहे. सदर दरास ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे. तसेच सदर निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत टँकर पुरवठा करणे कामी जुन्या निविदेतील दरानुसार होणाऱ्या वाढीव खर्चास ही सभामंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. अनिल विराणी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५६, **पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व किरकोळ देखभाल दुरुस्ती करिता जॉईंट व फिटींग्ज पुरवठा करणे कामाच्या निविदेला मंजुरी मिळणेबाबत.**

**अनिल विराणी :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात वरील कामाची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदेचे दर प्राप्त झाले आहेत.

१) **पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व किरकोळ देखभाल दुरुस्ती करिता जॉईंट व फिटींग्ज पुरवठा करणे.**
**(अंदाजित रक्कम रु. १,५०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) **मे. केसरी ॲण्ड कंपनी** | **अंदाजपत्रक दरापेक्षा २.००% जास्त दराने वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दराने** |
| २) मे. विंध्या ट्रेडर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा २.१५% जास्त दराने |
| ३) मे. भुषण कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रक दरापेक्षा ७.००% जास्त दराने |

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील कामाकरीता मे. केसरी ॲण्ड कंपनी यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामाच्या निविदेला ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**मोहन म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. ५६ :-**

**पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व किरकोळ देखभाल दुरुस्ती करिता जॉईंट व फिटींग्ज पुरवठा करणे कामाच्या निविदेला मंजुरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. ५० :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात वरील कामाची निविदा मागविण्यात आली होती. सदर कामी खालीलप्रमाणे निविदेचे दर प्राप्त झाले आहेत.

१) **पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व किरकोळ देखभाल दुरुस्ती करिता जॉईंट व फिटींग्ज पुरवठा करणे.**
**(अंदाजित रक्कम रु. १,५०,००,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | सादर केलेले दर |
|---|---|
| १) **मे. केसरी ॲण्ड कंपनी** | **अंदाजपत्रक दरापेक्षा २.००% जास्त दराने वाटाघाटीनंतर अंदाजपत्रक दराने** |

२) मे. विंध्या ट्रेडर्स अंदाजपत्रक दरापेक्षा २.१५**%** जास्त दराने

३) मे. भुषण कंन्स्ट्रक्शन अंदाजपत्रक दरापेक्षा ७.००**%** जास्त दराने

उपरोक्त कामाचा तुलनात्मक तक्ता पाहता वरील कामाकरीता मे. केसरी ॲण्ड कंपनी यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामाच्या निविदेला ही सभा मंजूरी देत आहे, असा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. अनिल विराणी अनुमोदन :- श्री. मोहन म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५७, **विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**अनिल विराणी :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणी पुरवठयासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापुरबावडी) येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे. (फेर-निविदा) (अंदाजित रक्कम रु. ४९,३८,०००/-)**

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **१) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** | **८.८२% जास्त दराने**<br>**वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दराने** |
| २) मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरिंग वर्क्स | **९.९६ % जास्त दराने** |

**२) मिरा (एम.आय.डी.सी.) येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे (फेर-निविदा) (अंदाजित रक्कम रू. २५,८१,८००/-)**

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
|---|---|
| **१) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** | **८.८२% जास्त दराने**<br>**वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दराने** |
| २) मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरिंग वर्क्स | **९.९६ % जास्त दराने** |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व अ.क्र. २ च्या कामांकरीता **मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सदर निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत जुन्या निविदेतील दरानुसार होणाऱ्या वाढीव खर्चास ही सभामंजूरी देत आहे.

**मिरादेवी यादव :-**

माझे अनुमोदन आहे.

**दिप्ती भट :-**

मा. सभापती महोदय दोनच निविदा आल्या आहेत. आपण ३ निविदा आल्यावर काढतो ना.

**सुरेश वाकोडे :-**

ह्या निविदेला दोनदा एक्स्टेन्शन दिलेले आहे. नंतर दोनच आल्यामुळे त्याची फेरनिविदा काढली. फेरनिविदा केल्यानंतर हे अंतिम केले.

**दिप्ती भट :-**

३ वेळा काढली का?

**सुरेश वाकोडे :-**

हो फेरनिविदा म्हटले आहे.

**जुबेर इनामदार :-**

कधी कधी ५ वेळा काढतो. ह्या वेळी दोन वेळातच आटपले. आपण नाही आले तर ५-५ वेळा काढतो. जुन्याला मुदतवाढ देतो.

**प्रकरण क्र. ५७ :-**

**विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**ठराव क्र. ५१ :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

१) **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणी पुरवठयासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापुरबावडी) येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे. (फेर-निविदा) (अंदाजित रक्कम रु. ४९,३८,०००/-)**

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **१) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** | **८.८२% जास्त दराने<br>वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दराने** |
| २) मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरिंग वर्क्स | **९.९६ % जास्त दराने** |

**२) मिरा (एम.आय.डी.सी.) येथील पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे (फेर-निविदा) (अंदाजित रक्कम रु. २५,८१,८००/-)**

| ठेकेदाराचे नाव | देकार |
|---|---|
| **१) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** | **८.८२% जास्त दराने<br>वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दराने** |
| २) मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरिंग वर्क्स | **९.९६ % जास्त दराने** |

उपरोक्त कामांचा तुलनात्मक तक्ता पाहता अ.क्र. १ व अ.क्र. २ च्या कामांकरीता **मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** यांचे वाटाघाटीअंती प्राप्त झालेले दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने सदर कामांच्या निविदांना ही सभा मंजूरी देत आहे. तसेच सदर निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत जुन्या निविदेतील दरानुसार होणाऱ्या वाढीव खर्चास ही सभामंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन म्हात्रे** **अनुमोदन :- श्रीम. मिरादेवी यादव**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**

**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ५८, **विविध कामांच्या निविदांना मंजूरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

**सुरेश खंडेलवाल :-**

उपरोक्त विषयान्वये महानगरपालिका पाणी पुरवठा विभागात विविध कामांच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामी खालीलप्रमाणे निविदांचे दर प्राप्त झाले आहेत.

**१) शांती पार्क मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/ दुरूस्ती करणे. (फेर-निविदा) (अंदाजित रक्कम रु. ३३,६४,२००/-)**

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
| --- | --- |
| **१) मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरिंग वर्क्स** | **५.९०% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दराने** |
| २) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | **६.२१ % जास्त दराने** |

**२) सृष्टी मलनिःसारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/ दुरूस्ती करणे. (फेर-निविदा) (अंदाजित रक्कम रू. ३३,६४,२००/-)**

| **ठेकेदाराचे नाव** | **देकार** |
| --- | --- |
| **१) मे. ॲकॉर्ड वॉटरटेक ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.** | **६.२१% जास्त दराने वाटाघाटीअंती अंदाजपत्रक दराने** |
| २) मे. ग्रॅव्हिट इंजिनिअरिंग वर्क्स | **७.५० % जास्त दराने** |

